cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–५ | मंगळवार दि.२४ मार्च २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### महागाईची भीती अन भारताची तयारी !

विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी नुकतेच समाज माध्यमावर एक मोठे विधान केले की, महागाईची मोठी लाट येतेय. रुपया डॉलरच्या तुलनेत कमकुवत होत आहे आणि औद्योगिक इंधनाच्या किंमती झपाट्याने वाढत आहेत. याचा परिणाम उत्पादन आणि वाहतुकीवर होईल, लघु उद्योगांना सर्वात जास्त फटका बसेल, रोजच्या वस्तू महाग होतील आणि विदेशी गुंतवणूकदारांचा पैसा बाहेर जाईल, ज्यामुळे शेअर बाजारावर दबाव येईल.

# ऊस वजनकाट्यांवरील ‘तफावत’ प्रकरण तापले!

## शेतकऱ्यांचा आरोप ‘थेट लूट’; सरकार म्हणते ‘तक्रारीच नाहीत!’

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक हक्कांशी निगडित असलेला वजनकाटा वाद आता गंभीर वळणावर पोहोचला आहे. खासगी वजनकाटे आणि साखर कारखान्यांच्या वजनकाट्यांमध्ये मोठी तफावत असल्यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होत असल्याच्या तक्रारी विविध स्तरांवरून पुढे येत असताना, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी मात्र अशा कोणत्याही अधिकृत तक्रारी जानेवारी २०२६ मध्ये प्राप्त झाल्या नसल्याचा ठाम दावा केला आहे. त्यामुळे “शेतकरी खोटं बोलत आहेत का, की यंत्रणाच डोळेझाक करत आहे?” असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे.**

या गंभीर प्रकरणावर विधानपरिषदेत जोरदार चर्चा झाली. आमदार सदाभाऊ खोत, प्रविण दरेकर, प्रसाद लाड, उमा खापरे, डॉ. परिणय फुके आणि चित्रा वाघ यांनी हा मुद्दा आक्रमकपणे उपस्थित करत शेतकऱ्यांची होत असलेली आर्थिक लूट थांबवण्याची मागणी केली. त्यांनी सरकारला थेट सवाल केला की,



“खासगी काट्यावर एक वजन आणि कारखान्यात दुसरे वजन कसे?” “२–२ टनांचा फरक येतो, ही साधी चूक नाही तर संगनमत नाही का?” सांगली जिल्ह्यातील एका शेतकऱ्याने ऊस कारखान्याकडे पाठवण्यापूर्वी इस्लामपूर येथील खासगी वजनकाट्यावर वजन केले असता आणि नंतर कारखान्यातील वजनामध्ये तब्बल २ टनांचा फरक आढळल्याचा गंभीर आरोप समोर आला. मात्र या घटनेबाबतही कोणतीही अधिकृत तक्रार नोंद झालेली नसल्याचे मंत्री भुजबळ यांनी स्पष्ट केले. यामुळे प्रश्न अधिकच गंभीर झाला आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी आपल्या लेखी उत्तरात स्पष्ट केले की, खासगी आणि साखर कारखान्यांचे दोन्ही वजनकाटे वैध मापनशास्त्र विभागाकडून प्रमाणित केले जातात. सर्व ठिकाणी एकसमान कार्यपद्धती लागू आहे. २ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या आदेशानुसार खासगी वजनकाट्यावर केलेले वजनही ग्राह्य धरण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानंतर ९ नोव्हेंबर २०२२ रोजी साखर आयुक्तांनी सर्व ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### कच्च्या तेलाचे दर ६० टक्क्यांनी वाढले

नवी दिल्ली : अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षाचा परिणाम आता थेट सर्वसामान्यांच्या खिशावर होऊ लागला आहे. वाढत्या तणावामुळे जागतिक स्तरावर ऊर्जा संकट निर्माण झाले असून कच्च्या तेलाच्या किंमतीत मोठी वाढ झाली आहे. अवघ्या एका महिन्यात कच्च्या तेलाचे दर सुमारे ६० टक्क्यांनी वाढले आहेत. २८ फेब्रुवारीला युद्ध सुरू झाले तेव्हा कच्च्या तेलाची किंमत सुमारे ७० डॉलर प्रति बॅरल होती. मात्र २३ मार्चपर्यंत ती वाढून ११४.७५ डॉलर प्रति बॅरल या धोकादायक पातळीवर पोहोचली आहे. गेल्या ३० दिवसांत कच्च्या तेलाच्या किंमतीत झालेल्या वाढीमुळे जागतिक पुरवठा साखळीवर मोठा परिणाम झाला आहे. या संकटाच्या केंद्रस्थानी स्ट्रेट ऑफ होर्मुझ हा महत्त्वाचा समुद्री मार्ग आहे. हा समुद्री मार्ग जागतिक कच्च्या तेलाच्या व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. सध्या सुरू असलेल्या लष्करी हालचाली आणि तणावामुळे या मार्गावरून जाणाऱ्या मालवाहू जहाजांच्या वाहतुकीत मोठा अडथळा निर्माण झाला आहे. पुरवठा कमी झाल्याने जागतिक बाजारात तेलाच्या किंमती झपाट्याने वाढत आहेत.

### तामिळनाडूत भाजप २३४ पैकी २७ जागांवर लढणार

चेन्नई: तामिळनाडूमध्ये आगामी विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (रालोआ) आपला जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित केला आहे. एकूण २३४ मतदारसंघांपैकी अण्णाद्रमुक १७८ जागांवर, तर भाजप २७ जागांवर निवडणूक लढवणार आहे. आघाडीतील इतर घटक पक्षांनाही जागांचे वाटप करण्यात आले असून, यात पीएमकेला १८ आणि एएमएमकेला ११ जागा देण्यात आल्या आहेत. अण्णाद्रमुकचे नेते एडप्पाडी के. पलानीस्वामी यांनी सांगितले की, आघाडीतील चर्चा अत्यंत सुरळीत पार पडली असून जागांच्या संख्येवर अधिकृत शिक्कामोर्तब झाले आहे. इतर काही पक्षांशी अद्याप चर्चा सुरू असून त्यांच्या जागांची घोषणा लवकरच केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### आरोग्य विभागातील विविध पदांची भरती टप्प्याटप्प्याने

मुंबई: आरोग्य विभागांमध्ये कंत्राटी पद्धतीने जिथे काम सुरू आहे तिथे नियमानुसार कार्यवाही केली जात आहे. आरोग्य विभागातील पदभरती करण्याकरिता नवीन आकृतिबंध तयार करण्यात येत असून, विविध पदांची भरती टप्प्याटप्प्याने केली जाणार आहे, असे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत तारांकित प्रश्नोत्तरावेळी सांगितले. सदस्य नाना पटोले यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, आरोग्य विभागातील पदभरती करण्याकरिता नवीन आकृतिबंध तयार करण्यात येत असून, विविध पदांची भरती टप्प्याटप्प्याने केली जाणार आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सुमारे १० हजार कर्मचारी कार्यरत असून, त्यांच्या सेवासंबंधीही निर्णय घेण्याची कार्यवाही सुरू आहे. आरोग्य विभागात कंत्राटी पद्धतीने गट ‘क’ आणि गट ‘ड’ मधील कर्मचारी मोठ्या प्रमाणात कार्यरत असून, त्यांच्या वेतन आणि हक्कांबाबत तक्रारी आल्यास त्या गांभीर्याने घेतल्या जातील. कंत्राटी तत्वावरील कर्मचाऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण करताना सेवा अधिक परिणामकारक करण्यावर भर दिला जाणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२३ मार्च २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३६१.५० क्विंटल | १,९०० | २,४२० | २,१९८ |
| ज्वारी/हायब्रिड: २५२.५० क्विंटल | १,५०० | ४,३०० | ३,१४३ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १०.०० क्विंटल | ७,५२५ | ७,५२५ | ७,५२५ |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरी: १४.०० क्विंटल | २,८०१ | २,८०१ | २,८०१ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १०.०० क्विंटल | ५,३५० | ५,३५० | ५,३५० |
| हरभरा: १९.०० क्विंटल | ४,९०० | ५,८०१ | ५,१७५ |

# ५ दिवसासाठी युध्दाला स्थगिती डोनाल्ड ट्रम्प यांची मोठी घोषणा




वॉशिंग्टन । वृत्तसंस्था

मध्यपूर्वेतील वाढता तणाव पूर्णपणे निवळण्याच्या उद्देशाने अमेरिका आणि इराण यांच्यात अत्यंत सकारात्मक चर्चा सुरू झाली असल्याचे संकेत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिले आहेत. तसेच चर्चा पुढे सुरू ठेवता यावी यासाठी इराणचे वीज प्रकल्प आणि ऊर्जा पायाभूत सुविधांवर नियोजित असलेले कोणतेही हल्ले पाच दिवसांसाठी स्थगित करण्याचे आदेश दिल्याचे अमेरिकन नेत्याने सांगितले. युद्ध चौथ्या आठवड्यात प्रवेश करत असताना, तणाव कमी होण्याचे हे पहिले सार्वजनिक संकेत मानले जात आहेत. दरम्यान, इराणकडून अद्याप कोणत्याही अटी स्वीकारल्याचे संकेत मिळालेले नाहीत किंवा औपचारिक चर्चा सुरू असल्याच्या वृत्ताला दुजोराही देण्यात आलेला नाही.

ट्रम्प यांनी त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील पोस्टमध्ये म्हटले आहे की, “मला कळवताना आनंद होत ▶▶ पान २ वर

### ४८ तासांचा अल्टिमेटम

अमेरिकेने दिलेल्या अल्टिमेटमला प्रत्युत्तर म्हणून इराणने नवीन आणि स्पष्ट धमक्या दिल्यानंतर काही तासांतच ट्रम्प यांची ही घोषणा आली आहे. सोमवारी, इराणच्या अधिकाऱ्यांनी इशारा दिला होता की, आमच्या भूभागावर पुन्हा हल्ला झाला, तर ते आखाती समुद्रात समुद्री सुरुंग पसरवतील आणि इराणमधील सर्व वीज केंद्रांवर हल्ले करतील. इराणने संभाव्य लक्ष्यांचे नकाशे देखील प्रसिद्ध केले होते. यामध्ये इस्रायलमधील दोन सर्वात मोठे वीज प्रकल्प तसेच सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती, कतार आणि कुवेत मधील केंद्रांचा समावेश होता.

# युद्धामुळे परिस्थिती चिंताजनक

## भारताची आता ४१ देशांकडून आयात–मोदी

दिल्ली । वृत्तसंस्था



पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी लोकसभेत महत्त्वाचे भाषण करत भारताची भूमिका स्पष्ट केली. मागील २४ दिवसांपासून सुरू असलेल्या संघर्षामुळे जागतिक ऊर्जा पुरवठा, व्यापार आणि भारतीय नागरिकांच्या सुरक्षेबाबत चिंता वाढली आहे. अशा परिस्थितीत भारताने संतुलित भूमिका घेत कूटनीती आणि संवादाच्या माध्यमातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला आहे.

पंतप्रधानांनी सांगितले की, होर्मुज सामुद्रधुनीत कोणताही अडथळा तयार करणे भारताला मान्य नाही. कारण देशातील मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल, गॅस आणि खतांची आयात या मार्गावर अवलंबून आहे. या मार्गावर परिणाम झाल्यास देशाच्या अर्थव्यवस्थेवर थेट परिणाम होऊ शकतो. त्यामुळे भारत सरकार विविध देशांशी सतत संपर्कात असून, पर्यायी पुरवठा साखळी मजबूत करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यासाठी आधी २७ देशांकडून होणारी आयात आता ४१ देशांपर्यंत ▶▶ पान २ वर

# महिला आयोगसाठी भाजप आग्रही राष्ट्रवादीला बदल्यात काय मिळणार

मुंबई । प्रतिनिधी

नाशिकमधील महिला अत्याचार आणि बलात्कार प्रकरणातील आरोपी भोंदू अशोक खरातच्या अटकेनंतर त्याच्या शिष्य असलेल्या रुपाली चाकणकर यांचाही राजीनामा घेण्यात आला आहे. राज्य महिला आयोग पदावरुन रुपाली चाकणकर पायउतार झाल्या असून, आता राष्ट्रवादीकडून महिला आयोगाचे अध्यक्षपद काढून घेण्याचा प्रयत्न भाजपकडून सुरू असल्याची माहिती आहे. भाजपने महिला आयोगाचे अध्यक्षपद आता आपल्याकडे ठेवण्यासाठी आग्रह धरला असून, बदल्यात राष्ट्रवादी काँग्रेसला महामंडळ देण्यात येणार असल्याचे समजते.

महिला आयोग पदावरून राष्ट्रवादी आणि भाजपात रस्सीखेच सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. महिला आयोग पद महायुतीत राष्ट्रवादीच्या वाट्याला असल्यामुळे ▶▶ पान २ वर

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ‘राजमाता जिजाऊ’ एसटी बससेवेचे लोकार्पण

जालना प्रतिनिधी

**महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत राज्याच्या सार्वजनिक परिवहन व्यवस्थेत नव्या पर्वाची सुरुवात होत आहे. ‘राजमाता जिजाऊ’ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या अत्याधुनिक एसटी बससेवेचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत २४ मार्च २०२६ रोजी विधिमंडळाच्या प्रांगणात होणार आहे.**



या सोहळ्यास विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे आणि विधानसभेचे अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. मंत्री सरनाईक म्हणाले की, ‘राजमाता जिजाऊ’ बससेवेच्या समावेशामुळे एसटीच्या ताफ्यात परंपरा आणि प्रगती यांचा सुंदर संगम साधला गेला आहे. लवकरच एसटी महामंडळाच्या ताफ्यात तब्बल तीन हजार ‘राजमाता जिजाऊ’ या नावाने नव्या स्मार्ट बसेस दाखल होणार असून, त्यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला मोठे बळ मिळणार आहे. या बसेसना ‘राजमाता जिजाऊ’ हे नाव देण्यामागे हिंदवी स्वराज्याच्या प्रेरणास्थान असलेल्या जिजाऊसाहेबांना ▶▶ पान २ वर

# संघ मुख्यालयावर ‘जनआक्रोश’ मोर्चा

## प्रकाश आंबेडकरांचा पंतप्रधान मोदींवर हल्ला

नागपूर । प्रतिनिधी


**नागपूरमध्ये सोमवारी राजकीय वातावरण चांगलेच तापले. वंचित बहुजन आघाडी आणि काँग्रेस यांनी संयुक्तपणे काढलेल्या विशाल ‘जनआक्रोश मोर्चा’ने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयावर धडक दिली.**



‘एपस्टीन फाईल्स’मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींचे नाव आल्याचा खळबळजनक दावा करत, आंदोलकांनी केंद्र सरकार आणि संघाच्या विचारसरणीविरुद्ध जोरदार घोषणाबाजी केली. “देशाला एपस्टीन फाईलवाला पंतप्रधान नको,” अशा घोषणांनी रेशीमबाग परिसर दणाणून गेला होता. वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली निघालेला हा मोर्चा सकाळी नागपूरच्या मुख्य भागातून सुरू झाला. ▶▶ पान २ वर

# भोंदू खराताच्या हॉट स्टोरीत लफडेच लफडे

## वसीकरणासाठी भुजंग; दरबारात नेते मंडळींच्याही असायच्या रांगा




नाशिक /पुणे । प्रतिनिधी

**समोर आलेल्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाने संपूर्ण राज्यासह देशाला हादरवून सोडले आहे. स्वत:ला ‘कॅप्टन’ म्हणवून घेणाऱ्या भोंदू अशोक खरातने शेकडो महिलांचे लैंगिक शोषण केल्याचे आरोप समोर आल्यानंतर अनेक धक्कादायक बाबी उघड होत आहेत. विशेष म्हणजे, राज्यातील अनेक राजकीय नेते, अधिकारी आणि प्रतिष्ठित व्यक्तीही त्याच्याकडे भविष्य जाणून घेण्यासाठी जात असल्याची माहिती समोर येत आहे.**

गेल्या काही वर्षांपासून अशोक खरात हा लोकांच्या अडचणी सोडवतो, भविष्य सांगतो आणि यशाचा मार्ग दाखवतो, असा दावा करत होता. २०२२ साली तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी सिन्नर तालुक्यातील मिरगाव येथे जाऊन पूजा केल्यानंतर खरात अचानक चर्चेत आला आणि त्याची प्रसिद्धी राज्यभर पसरली. त्यानंतर राजकारणी, पोलीस अधिकारी, उद्योजक आणि मनोरंजन क्षेत्रातील अनेक मान्यवरांचा त्याच्याकडे वावर वाढू लागला. नाशिक पोलिसांनी बुधवारी रात्री खरातला अटक केल्यानंतर न्यायालयाने त्याला पोलीस कोठडी सुनावली आहे. सध्या विशेष तपास पथक त्याची ▶▶ पान २ वर



### “ पूजा करुन २० फुटी नागाला बोलवायचा

नाशिक हे धार्मिक विधींसाठी प्रसिद्ध असल्याचा फायदा घेत खरातने ‘सर्पपूजा’चा प्रकार सुरू केला. दरबारात जमलेल्या भाविकांसमोर तो ध्यानस्थ बसून तंत्र–मंत्रांचा जप करीत असे. काही वेळानंतर अचानक २० फुटांचा नाग प्रकट होत असल्याचा आभास निर्माण केला जात असे. खरातच्या इशाऱ्यावर हा नाग फणा काढून डोलत असल्याचे दृश्य पाहून उपस्थित भाविक घाबरून जात असत. या प्रकारामुळे अनेकांना खरातकडे दैवी शक्ती असल्याचा भास निर्माण होत असे. काही जण भीतीने बेशुद्ध पडल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत.

### “ महिलांना एकटं बोलावून करायचा शोषण

भक्तांच्या मनात भीती आणि अंधश्रद्धा निर्माण करून त्यांना आपल्या प्रभावाखाली ठेवणे, हीच खरातची मुख्य पद्धत असल्याचे तपासात स्पष्ट होत आहे. एकदा विश्वास बसल्यानंतर तो महिलांना वेगवेगळ्या कारणांनी एकटं बोलावून त्यांचे शोषण करत असल्याचा आरोप आहे. एकूणच, धार्मिक श्रद्धा, भीती आणि अज्ञान यांचा गैरफायदा घेत अशोक खरातने मोठं जाळं उभं केलं होतं. आता या प्रकरणाचा तपास पुढे जात असताना आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

cmyk

cmyk



## अग्रलेख

# महागाईची भीती अन भारताची तयारी !

विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी नुकतेच समाज माध्यमावर एक मोठे विधान केले की, महागाईची मोठी लाट येतेय. रुपया डॉलरच्या तुलनेत कमकुवत होत आहे आणि औद्योगिक इंधनाच्या किंमती झपाट्याने वाढत आहेत. याचा परिणाम उत्पादन आणि वाहतुकीवर होईल, लघु उद्योगांना सर्वात जास्त फटका बसेल, रोजच्या वस्तू महाग होतील आणि विदेशी गुंतवणूकदारांचा पैसा बाहेर जाईल, ज्यामुळे शेअर बाजारावर दबाव येईल. राहुल गांधी यांनी अंदाजही वर्तवला की, चार राज्यांच्या निवडणुकीनंतर पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीच्या दरात वाढ होईल. हे सर्व पश्चिम आशियातील युद्धामुळे घडत आहे, ज्यात इराण आणि इस्रायल यांच्यातील संघर्षामुळे तेल आणि गॅसचा पुरवठा रखडला आहे.

भारत जगातील तिसरा सर्वात मोठा तेल आयात करणारा देश आहे. आपल्याला जवळपास नव्वद टक्के तेल बाहेरून घ्यावे लागते आणि त्यातील बराचसा भाग पश्चिम आशियातून येतो. आता या भागातील युद्धामुळे सामुद्रिक मार्ग बंद झाला आहे. त्यामुळे तेलाची किंमत वाढली आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अभ्यासानुसार, तेलाची किंमत दहा डॉलर वाढल्यास देशाची अर्थवृद्धी थोडी कमी होईल आणि महागाई वाढेल. जर ही किंमत जास्त काळ टिकली तर अर्थव्यवस्थेवर दबाव येईल. आंतरराष्ट्रीय नाणे निधी आणि इतर तज्ञही सांगतात की, युद्ध दीर्घकाळ चालले तर जगभरात महागाई वाढेल आणि विकास मंदावेल. भारताची सध्याची स्थिती चांगली आहे कारण महागाई आता कमी पातळीवर आहे, पण युद्धामुळे सावध राहणे गरजेचे आहे.या परिस्थितीचे गांभीर्य काय आहे? हे फक्त कागदावरचे आकडे नाहीत. याचा थेट परिणाम सामान्य माणसाच्या खिशावर होईल. घरगुती गॅस महाग झाला तर स्वयंपाकाचा खर्च वाढेल. पेट्रोल-डिझेल वाढले तर बस आणि रिक्षाचे भाडे जास्त होईल. किराणा माल, औषधे आणि इतर रोजच्या वस्तूंच्या किंमती वाढतील. लघु उद्योग जसे छोटे कारखाने आणि दुकाने यांना कच्चा माल आणि वीज महाग पडेल, त्यामुळे नफा कमी होईल आणि नोकऱ्या धोक्यात येतील. शेतकऱ्यांना खत आणि वाहतुकीचा खर्च जास्त लागेल, ज्यामुळे अन्नधान्य महाग होईल. मोठ्या कंपन्यांचे उत्पादन महाग होईल आणि निर्यात करणे कठीण होईल. शेअर बाजार घसरला तर बचत आणि गुंतवणूक प्रभावित होईल. सरकारला जास्त अनुदान द्यावे लागेल, त्यामुळे रस्ते आणि इतर विकास कामांवर खर्च कमी होऊ शकतो. तरीही भारत काही प्रमाणात सुरक्षित आहे. कारण, आपण रशिया आणि इतर देशांतून तेल घेत आहोत आणि परदेशातून येणारा पैसा स्थिर आहे. सामान्य कुटुंबांना सर्वात जास्त त्रास होईल कारण त्यांची खरेदीची शक्ती कमी होईल. छोटे व्यवसाय बंद पडण्याची भीती आहे. शेतकरी आणि मजूर यांचे उत्पन्न दबेल. वाहतूक आणि पुरवठा साखळी अडकली तर दुकानांमध्ये माल कमी येईल. अर्थशास्त्रज्ञ सांगतात की, ही परिस्थिती काही महिने टिकली तर विकास मंद होईल आणि महागाई वाढेल, पण पूर्णपणे नियंत्रणाबाहेर जाणार नाही. राहुल गांधींचा इशारा योग्य आहे. युद्धामुळे पुरवठा खंडित झाला आहे आणि निवडणुकीनंतर दरवाढीची शक्यता आहे. पण सरकारचे म्हणणेही काही प्रमाणात खरे आहे. सध्याची महागाई रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मर्यादेपेक्षा कमी आहे आणि आपल्याकडे काही साठे आणि पर्याय आहेत. भारताची अर्थव्यवस्था लवचिक आहे. रेमिटन्स म्हणजे परदेशातून येणारा पैसा आणि विविध देशांतून तेल आणणे यामुळे धक्का मर्यादित राहू शकतो. दीर्घकाळ युद्ध चालले तर समस्या वाढेल, पण दोन-तीन महिन्यांत सावधगिरीने नियंत्रण शक्य आहे. राजकीय टीका आणि तज्ञांचे मत यांचा संतुलित विचार करणे गरजेचे आहे. या आव्हानातून बाहेर पडण्यासाठी सरकारने करायचे उपाय खूपच खडतर आहेत. ऊर्जेचे अधिकचे स्रोत सूर्यप्रकाश आणि वारा यावर आधारित वीज लवकर वाढवावी लागेल. नवीन प्रकारचे इंधन आणि पर्यायी स्रोत शोधावे लागतील. तेल आणि गॅसचे साठे पूर्ण भरावेत आणि आणीबाणीचा प्लॅन तयार ठेवायला हवा. तीव्रता कमी करण्यासाठी गरीब आणि सामान्य लोकांसाठी थेट मदत देणे सरकारच्या हाती आहे, जेणेकरून दरवाढ पूर्णपणे त्यांच्यावर पडू नये. निर्यात वाढवण्यासाठी छोट्या उद्योगांना मदत आणि नवीन प्रकल्प वेगाने पूर्ण करावे लागेल. रुपयाची स्थिरता राखण्यासाठी सावध धोरण ठेवले पाहिजे. शांतता प्रयत्नांना पाठबळ देणे आणि मित्र देशांसोबत चांगले करार करणे. दीर्घकाळासाठी उत्पादन वाढवणे आणि हरित ऊर्जेकडे वळणे गरजेचे आहे. अशावेळी सरकार सध्या काय करत आहे? वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांनी सरकारने केलेल्या उपाय योजना जाहीर केल्या आहेत. त्यांच्या सांगण्यानुसार, महागाई फार वाढणार नाही. तेल कंपन्यांना दरवाढ रोखण्यास सांगितले आहे. घरगुती गॅससाठी पुरवठा वाढवण्याचे आदेश दिले आहेत. रुपयासाठी डॉलर विक्री केली जात आहे. अनुदानासाठी तयारी ठेवली आहे आणि विकास कामे चालू ठेवण्याचा प्रयत्न आहे. निवडणुकीमुळे दरवाढ टाळण्याचे संकेत आहेत. तेल आयात विविध ठिकाणून केली जात आहे आणि साठे पुरेसे आहेत असे आश्वासन दिले आहे. हे आव्हान आहे पण संधीही आहे. सरकारने फक्त प्रतिसाद देण्याऐवजी सक्रिय पावले उचलावीत. विरोधी पक्ष नेते म्हणून राहूल गांधींनी जो धोक्याचा इशारा दिला आहे तो गांभीर्याने घ्यावा. हरित ऊर्जेत गुंतवणूक वाढवल्यास आयात कमी होईल आणि भविष्यात कायमची स्थिरता येईल. तज्ञांचाही अंदाज आहे की, योग्य पावले उचलल्यास सहा महिन्यांत या समस्येवर नियंत्रण शक्य आहे. भारताची अर्थव्यवस्था मजबूत आहे. सर्व पक्ष एकत्र आल्यास सामान्य माणसाच्या खिशाचे रक्षण होईल आणि विकास सात टक्क्यांवर राहील. महागाई चार टक्क्यांखाली ठेवता येईल. अशा काळात सरकारकडूनही राजकारणाऐवजी, शांतता आणि सावध धोरण हाच सर्वोत्तम मार्ग आहे.

# अंधश्रद्धा भोंदुगिरी निर्मूलन काळाची गरज..

समाजातील अंधश्रद्धा भोंदुगिरी निर्मूलन करणे ही आधुनिक काळाची नितांत गरज आहे, कारण ती समाजाच्या वैज्ञानिक आणि मानसिक प्रगतीतीलफार मोठा प्रमुख अडथळा आहे. समाज व्यवस्थेत अज्ञान,भीती आणि अंधभक्तीमुळे मानवी हक्कांचे शोषण होते. वैज्ञानिक दृष्टिकोन, शिक्षण आणि तर्कशुद्ध विचारांचा प्रसार करून मिळणाऱ्या ज्ञानामुळे समाज सुसंस्कृत, पुरोगामी आणि शोषणमुक्त होऊ शकतो, ज्यामुळे राज्य व देशाचा खरा विकास शक्य आहे.

**अंधश्रद्धा व भोंदूगिरी निर्मूलन: काळाची गरज.**

२१ व्या शतकात आपण विज्ञानाच्या युगात जगत आहोत, तरीही आपला समाज अनेक अंधश्रद्धांमध्ये अडकलेला आहे. अंधश्रद्धा म्हणजे पुराव्याशिवाय श्रद्धा बाळगणे आणि अज्ञानामुळे होणारे आचरण ही एक प्रकारे समाजाला लागलेली कीड असून,समाजाच्या प्रगतीच्या मार्गातील मोठा अडथळा आहे.

**समाज व्यवस्थेवर अंधश्रद्धेचे भोंदूगिरीचे होणारे दुष्परिणाम:**

१).शोषण: बाबा-बुवा, जादुटोणावाले ज्योतिषी सामान्य लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन आर्थिक व शारीरिक,मानसिक,सामाजिक शोषण करतात.

२).आरोग्य हानी: अघोरी प्रथा (जसे की नरबळी, जटा ठेवणे) आणि आजारावर औषधोपचार न करता जादूटोणा करण्यामुळे अनेकांच्या जीवीत्वास धोका निर्माण होतो.काही ना अघोरी प्रकारामुळे कायमचे अपंगत्व येते. ३)मानसिक गुलामगिरी: भीतीमुळे माणूस स्वतःच्या बुद्धीचा वापर करणे बंद करतो. अंधश्रद्धेच्या किंवा भोंदूगिरी करणाऱ्या व्यक्तीच्या अधिन होवून स्वतः हाचा विनाश करून घेतात.ज्यामुळे व्यक्तीची आणि समाजाची अधोगती होते.

**अंधश्रद्धा व भोंदूगिरी निर्मूलन करणे गरजेचे आहे.**

वैज्ञानिक दृष्टिकोन: आज आधुनिक युगात अंधश्रद्धा व भोंदूगिरी निर्मुलनासाठी प्रत्येकाने तर्कशुद्ध बौद्धिक विचार करायला हवा.''का'' आणि ''कसे'' या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठीविचार क्षमता निर्माण केली पाहिजे. सामाजिक प्रबोधन: आजच्या आधुनिक शिक्षणातून वर्तन बदल घडवून आणणे आवश्यक आहे. समाजात जागृत झाल्यास अंधश्रद्धा पसरवणारे आपोआप नष्ट होतील.अंधश्रद्धा भोंदूगिरी निर्मुलनासाठी समाजात या वाईट पद्धतीने होणारे परिणाम किती भयानक आहेत या विषयावर प्रबोधन करणे व समाजातील चुकीच्या गोष्टी समाज जागृतीने समाजाच्या लक्षात आणुन देणे जेणेकरून समाजाचे नुकसान होणार नाही. कायद्याची अंमलबजावणी: महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीसारख्या प्रयत्नांना सक्षमपणे बळ देवुन, भोंदूगिरी विरोधी व अंधश्रद्धेविरुद्धचे कायदे अधिक प्रभावी व कडक करणे गरजेचे आहे.या मार्गाने समाजाला फसवुण,शोषणन करून कमावलेली संपत्ती जप्त करून राष्ट्रीय संपत्ती म्हणून जमा करणारे कडक कायदा करण्याची गरज आहे. अनेक घटना अंधश्रद्धा व भोंदूगिरीने फसवणूक अत्याचार करणाऱ्या भोंदु बाबांचे समाजासमोर येत आहेत. अशा प्रकारे समाजाला फसवुन लैंगिक शोषण, आर्थिक शोषणाला बळी पडणाऱ्या पिडीतानी अशा भोंदूगिरी करणाऱ्यांचा बुरखा फाडून कायदेशीर गुन्हे दाखल केले पाहिजेत.तरच अशा प्रवृत्तींना आळा बसेल. अंधश्रद्धा व भोंदूगिरी निर्मूलन म्हणजे धर्माचा विरोध नाही, तर ती माणुसकीच्या बाजूने उभे राहण्याची चळवळ आहे. प्रगत व सुखी समाजासाठी, आपण सर्वांनी डोळसपणे जगले पाहिजे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे. समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर व समाज प्रतिनिधित्व करणाऱ्या वर्गाने व विविध प्रकारचे राजकीय लोकप्रतिनिधीत्व करणाऱ्या वर्गाने अंधश्रद्धा व भोंदूगिरी पासुन दुर राहीले पाहिजे कारण समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वर्गाकडे समाज घडविण्याची जबाबदारी असते. त्यांच्या कृतीकडे समाज मार्गदर्शक म्हणून पाहत असतो.तेव्हा या वर्गाने स्वच्छ व पारदर्शक, आदर्श विचाराना जवळ केले पाहिजे.अधुनिक प्रगतिशील विचारांचा पुरस्कार केला तर. समाजातून अज्ञान दूर होईल, तेव्हाच खऱ्या अर्थाने अंधश्रद्धा व भोंदूगिरीचे निर्मूलन होईल..



**डॉ.राजेंद्र मुरलीधर सानप**
सदस्य -महाराष्ट्र राज्य ग्रंथालय
संघ इंद्रप्रस्थ कॉलनी बीड
मो नं.९४२००१९५९७

# तुळजाई चौक कॅनॉल रोड येथील अवैद्य दारू विक्री बंद करण्याची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील तुळजाई चौक कॅनॉल रोड येथे राजरोसपणे अवैद्य दारू विक्री होत असून संमधित खाते व पोलीस खाते जाणून बुजून याकडे दुर्लक्ष करीत आहे असे निदर्शनास येत असून यामागील सत्य परिस्थिती अशी आहे की सदरील दारूचे गुत्ते हे कोणीतरी पोलीस खात्यामध्ये असणारे अधिकारी कर्मचारी चालवीत असल्यामुळे याकडे जाणून बुजून दुर्लक्ष होत आहे एक अड्डा तर स .मा. गर्गे यांचे स्मारक तुळजाई चौकामध्येच असून त्या स्मारकाच्या गेटवर या दारू अड्ड्यातून निघणारे लोक लघु शंका सुद्धा करतात याकडे संबंधित खात्याने गांभीर्याने लक्ष घातले नाहीत तर या भागातील नागरिक व लोकप्रतिनिधी आंदोलनाच्या पावित्र्यात असल्याचे समजते केज तालुक्यातील युसूफवडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक विश्वजीत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली बनावट दारू जप्त केलेल्या कारवाईचे जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष गोविंद वनवे यांनी स्वागत केले असून यापुढेही जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात बनावट दारूचे कारखाने व अवैद्य विक्री चालू असून अशीच मोहीम चालू ठेवून त्यावरही ठोस कार्यवाही करण्याची विनंती गोविंद वनवे यांनी केली आहे.

# रेडयाच्या टकरीवरुन झालेल्या वादातुन युवकाचा खून

**जालना । प्रतिनिधी**

रेड्याची टक्कर होती पण त्यासाठी पोलिसांनी परवानगी दिली होती का सदरील ठिकाणी पोलीस बंदोबस्त होता का असे अनेक प्रश्न समोर येत आहे.जालना शहरात २२ मार्च रोजी फिर्यादी प्रेम अशोक लाड रा. गवळी मोहल्ला जुना जालना व त्याचा भाउ रविंद्र लाड व भाचा नरेश अवघड असे आरोपी सोमनाथ अशोक लाड याचे सोबत रेडयाची टक्कर वरुन किरकोळ स्वरुपाचा वाद झाला होता यातील आरोपीतांनी फिर्यादी व त्याचा भाऊ नातेवाईक यांना मोतीबाग ईदगाह जुना जालना येथे बोलावुन अगोदर



झालेला वाद मिटवण्याकरीता बोलावुन घेवुन तेथे हातात तलवार चाकु व लोखंडी रॉड ने मारहाण केली सदर मारहाणी मध्ये फिर्यादी व त्याचा भाऊ रवि लाड यांना गंभीर दुखापत झाली आहे. त्यामुळे त्यांना औषध उपचाराकामी सरकारी दवाखाना जालना येथे ॲडमीट केले होते फिर्यादीचा भाऊ रवि लाड याला डोक्यामध्ये गंभीर दुखापत झाल्याने त्याला पुढील उपचारकामी छ. संभाजीनगर येथे ॲडमिट करण्यात आले होते. उपचारा दरम्यान फिर्यादीचे तक्रारीवरुन कदीम जालना पोलीस ठाणे गुरनं १२६/२०२६ भान्यासं कलम १०९, ३(५) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर जखमी साक्षीदार रविंद्र अशोक लाड वय २१ वर्षे, याचेवर उपचार चालु असतांना उपचारा दरम्यान सोमवारी सकाळी मरण पावला आहे. सदर गुन्हयात वाढीव कलम १०३ (१) वाढ करण्यात आले असुन सदर आरोपीत यांचा शोध घेण्याकरीता पोलीस ठाणेकडील तीन पथक तयार करण्यात आले होते. सदर पथकांनी सदर गुन्हयातील आरोपीत १) संतोष श्रीचंद लाड, २) सुरज दादाराव सतकर दोन्ही रा. इंदीरानगर, गवळी मोहल्ला ३) सोमनाथ अशोक लाड रा. संजयनगर यांना आज सकाळी ०९.३० वाजेच्या सुमारास काजळा गावाच्या परीसरातुन शिताफीने ताब्यात घेतले आहे. सदर आरोपीत यांच्यावर अटकेची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा.श्री.अजय कुमार बसंल, पोलीस अधीक्षक जालना, मा.श्री. आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक जालना, मा.श्री. अनंत कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधीकारी जालना यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.जे.बी.शेवाळे, पोलीस निरीक्षक, कदीम जालना पोलीस ठाणे, सपोनि / आरती जाधव, पोउपनि / दिनकर मोरे, पोहेकों/ सदा राठोड, पोहेकॉ सचीन चौधरी, चापोहेकॉ अशोक खरात, पोना/बाबा गायकवाड पोकों/मतीन शेख, पोकों/विलास राऊत, पोकों/बलाराम जारवाल, पोकों/ कृष्णा चव्हाण, पोकों/ सदाशिव मुटकुळे, पोकों/ नंदु टेकाळे सूर्व नेमणूक कदीम जालना पोलीस ठाणे यांनी केली आहे.

## पान १ वरून...

### ऊस वजनकाट्यांवरील 'तफावत'

कारखान्यांना याबाबत सूचना दिल्या आहेत. सरकारच्या या भूमिकेमुळे प्रशासन आपली जबाबदारी पार पाडत असल्याचा दावा करत आहे. शेतकऱ्यांचा विश्वास परत मिळवण्यासाठी सरकारकडून काही उपाययोजना सुचवण्यात आल्या आहेत. साखर कारखान्यांमध्ये कॅलिब्रेटेड वाहन काटे बसवणे, सर्व वजन प्रक्रिया ऑनलाईन प्रणालीशी (केंद्रीय सर्व्हर) जोडणे, वजन प्रक्रियेत रिअल-टाईम मॉनिटरिंग मात्र हे सर्व उपाय अद्याप ''विचाराधीन'' अवस्थेत असल्याने प्रत्यक्षात अंमलबजावणी कधी होणार, हा मोठा प्रश्न आहे. दरम्यान, राज्यातील अनेक ऊस उत्पादक शेतकरी या प्रकरणावर नाराजी व्यक्त करत आहेत. त्यांचे म्हणणे आहे की आमच्या डोळ्यांसमोर वजन कमी दाखवलं जातें .प्रत्येक ट्रकमागे हजारो रुपयांचे नुकसान होते. तक्रार केली तर पुढचा ऊस उचलला जात नाही. भीती आणि अविश्वासाची भावना अधिकच धोकादायक मानली जात आहे. ऊस वजनकाटा प्रकरणात सरकार आणि शेतकरी यांच्यात स्पष्ट दरी दिसून येत आहे. एका बाजूला सरकार ''तक्रारीच नाहीत'' असे सांगत आहे, तर दुसऱ्या बाजूला शेतकरी मोठ्या प्रमाणावर लूट सुरू आहे असा आरोप करत आहेत.

-------------

### युद्धामुळे परिस्थिती चिंताजनक

वाढवण्यात आली आहे. या संकटाच्या काळात भारताकडे ५.३ दशलक्ष मेट्रिक टनांहून अधिक स्ट्रॅटेजिक पेट्रोलियम साठा असल्याची माहितीही पंतप्रधानांनी दिली. यामुळे तात्पुरत्या अडचणींचा सामना करण्यास देश सक्षम असल्याचं त्यांनी सांगितलं. याशिवाय सरकारने एक विशेष गट स्थापन केला असून तो दररोज बैठक घेऊन आयात-निर्यात, पुरवठा आणि लॉजिस्टिकमधील अडचणींचा आढावा घेत आहे. पश्चिम आशियातील देशांमध्ये सुमारे १ कोटी भारतीय काम करत असल्याने त्यांची सुरक्षा ही भारतासाठी सर्वात मोठी प्राथमिकता असल्याचं पंतप्रधानांनी अधोरेखित केलं. युद्ध सुरू झाल्यापासून आतापर्यंत सुमारे ३ लाख ७५ हजार भारतीयांना सुरक्षितपणे देशात परत आणण्यात यश मिळालं आहे. तसेच युद्धग्रस्त भागात अडकलेल्या भारतीयांना मदत करण्यासाठी २४७ हेल्पलाइन आणि विशेष मिशनद्वारे काम सुरु आहे. या संकटाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी देशांतर्गत परिस्थितीवरही लक्ष केंद्रित केलं. त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, साठेबाजी आणि काळाबाजार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. राज्य सरकारांनाही याबाबत सूचना देण्यात आल्या असून आवश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत ठेवण्यावर भर देण्यात आला आहे. दरम्यान, विरोधकांकडून या मुद्द्यावर सतत चर्चा करण्याची मागणी होत असताना पंतप्रधानांनी सरकारची तयारी आणि उपाययोजना सांगितल्या आहेत. त्यांनी सांगितलं की, या संकटाचा परिणाम कमी करण्यासाठी पेट्रोलियम, वीज, खत आणि इतर महत्त्वाच्या क्षेत्रांवर सतत लक्ष ठेवण्यात येत आहे. जागतिक तणावाच्या या पार्श्वभूमीवर भारताने संयम, कूटनीती आणि व्यावहारिक मार्ग स्वीकारला असून देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर समतोल राखण्याचा प्रयत्न सुरू आहे.

--------------

### ५ दिवसासाठी युध्दाला स्थगिती

आहे की, गेल्या दोन दिवसांत युनायटेड स्टेट्स आणि इराणमध्ये मध्यपूर्वेतील शत्रुत्व पूर्णपणे संपवण्याबाबत अत्यंत सकारात्मक आणि विधायक चर्चा सुरु झाली आहे. या सखोल आणि सकारात्मक चर्चेचा कल लक्षात घेता, मी संरक्षण विभागाला इराणच्या वीज प्रकल्पांवर आणि ऊर्जा पायाभूत सुविधांवरील सर्व लष्करी हल्ले पाच दिवसांच्या कालावधीसाठी पुढे ढकलण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, हे चालू असलेल्या बैठका आणि चर्चेच्या यशावर अवलंबून असेल.'' ट्रम्प यांनी यात एक महत्त्वाची अट घातली आहे. हल्ले थांबविण्याबाबत स्थगिती तात्पुरती असून ती पूर्णपणे वाटाघाटींच्या पुढील प्रगतीवर अवलंबून आहे. दुसरीकडे, इराणकडून अद्याप कोणत्याही अटी स्वीकारल्याचे संकेत मिळालेले नाहीत किंवा औपचारिक चर्चा सुरू असल्याच्या वृत्ताला दुजोराही देण्यात आलेला नाही.

-----------

### संघ मुख्यालयावर

कार्यकर्त्यांच्या हातात केंद्र सरकार आणि संघाचा निषेध करणारे बॅनर्स होते. मोर्चा संघ मुख्यालयाच्या दिशेने सरकत असताना पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त तैनात केला होता.

------------

### मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'राजमाता

अभिवादन करण्याची भावना आहे. स्वराज्याचे शिल्पकार छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मागील संस्कारशक्ती म्हणजे राजमाता जिजाऊ होय. या मातृशक्तीचा गौरव या नावातून अधोरेखित करण्यात आला आहे. एसटी महामंडळाने यापूर्वी 'शिवनेरी', 'शिवशाही', 'शिवाई', 'यशवंती' आणि 'हिरकणी' अशा ऐतिहासिक नावांनी बससेवेला वेगळी ओळख दिली आहे. त्या गौरवशाली परंपरेत आता 'राजमाता जिजाऊ' या नावाची भर पडल्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा सन्मान अधिक समृद्ध झाला आहे, असेही मंत्री सरनाईक यांनी नमूद केले.

**नव्या बसेसची ठळक वैशिष्ट्ये**

या बसेसमध्ये ३२ आसन रचना असून एकूण ५६ आसन क्षमता आहे, जी सध्याच्या बसेसपेक्षा १६ आसनांनी अधिक आहे. त्यामुळे प्रवाशांना अधिक आरामदायी आणि सुलभ प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. अत्याधुनिक सुविधांनी सज्ज असलेल्या या बसमध्ये चार सीसीटीव्ही कॅमेरे, जीपीएस यंत्रणा, पॅनिक बटन, पब्लिक अनाउन्समेंट सिस्टीम तसेच इलेक्ट्रॉनिक मार्ग फलक यांचा समावेश आहे. त्यामुळे प्रवास अधिक सुरक्षित आणि स्मार्ट होणार आहे. या बसेस प्रामुख्याने दोन शहरांदरम्यानच्या अतिगर्दीच्या मार्गांवर शटल सेवेसाठी चालविण्यात येणार असून, त्यामुळे प्रवाशांचा वेळ वाचेल आणि वाहतुकीवरील ताण कमी होण्यास मदत होईल. या योजनेअंतर्गत पहिल्या ५० बसेस नागपूर येथे दाखल होणार असून, तेथून या नव्या सेवेला प्रारंभ करण्यात येणार आहे. 'राजमाता जिजाऊ' बससेवा ही केवळ वाहतुकीची सुविधा नसून महाराष्ट्राच्या इतिहासाचा अभिमान आणि आधुनिकतेचा आत्मविश्वास यांचा संगम आहे. या उपक्रमामुळे राज्यातील सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम, सुरक्षित आणि प्रवासी-केंद्रित होईल, अशी अपेक्षा मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केली

------

### महिला आयोगसाठी भाजप आग्रही

ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षालाच मिळावे अशी राष्ट्रवादीची भूमिका आहे. तर, राष्ट्रवादीच्या वाट्याला असणारे महिला आयोगपद स्वतःकडे घेऊन त्या बदल्यात महिला आर्थिक विकास महामंडळ देऊ, असा प्रस्ताव भाजपकडून देण्यात येत असल्याचे समजते. त्यामुळे, रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्यानंतर महिला आयोगाचे अध्यक्षपद राष्ट्रवादीकडे राहणार की भाजपला मिळणार याची उत्सुकता सर्वांनाच आहे. रुपाली चाकणकर यांच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाच्या राजीनाम्याबाबत राष्ट्रवादीत दोन गट पडले असून, एका गटाने तात्काळ राजीनामा मंजूर करण्याची भूमिका घेतली आहे. तर, दुसऱ्या गटाकडून केवळ फोटो आले म्हणून राजीनामा नको अशी भूमिका घेण्यात येत आहे. सुनेत्रा पवार यांनी मात्र अद्याप महिला प्रदेशाध्यक्ष पदाबाबत निर्णय घेतला नसल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे.

----------

### भोंदू खराताच्या हॉट

कसून चौकशी करत असून, या तपासात त्याने लोकांना जाळ्यात ओढण्यासाठी वापरलेली पद्धत (मोडस ऑपरेंडी) समोर येत आहे. त्याचबरोबर, राजकीय वर्तुळाशी त्याचे संबंध कसे मजबूत झाले, याचाही तपास सुरू आहे. सिन्नरच्या मिरगाव येथे मंदिर उभारल्यानंतर खरातने आपला 'दरबार' सुरू केला. ज्योतिष, अंकशास्त्र आणि धार्मिक विधींच्या नावाखाली तो लोकांच्या अडचणी सोडवण्याचा दावा करत असे. अपत्यप्राप्ती, वैवाहिक समस्या, नोकरीतील अडथळे, राजकीय भविष्य अशा विविध कारणांसाठी लोक त्याच्याकडे धाव घेत असत. विशेषतः पौर्णिमा आणि अमावस्येच्या दिवशी त्याच्या दरबारात मोठी गर्दी होत असे, ज्यामध्ये श्रीमंत आणि प्रभावशाली लोकांचाही मोठा सहभाग असायचा.त्याचे फार्महाउस देखील आहे त्याचा निकटवर्तीय असलेला व्यक्ती आणि मंदिरातील पुजारी तपासाचा विस्तार करत एसआयटीने खरातच्या 'ईशान्येश्वर' मंदिरातील पुजारी आणि काही कर्मचाऱ्यांना ताब्यात घेऊन चौकशीसाठी घेतले. या चौकशीमधून मंदिर आणि खरातच्या फार्म हाऊसवर नेमक्या कोणत्या प्रकारच्या हालचाली सुरू होत्या, याचा उलगडा होण्याची शक्यता आहे.याच प्रकरणात अनेक नेत्याची नावे देखील पुढे येण्याची शक्यता वर्तवण्यात येते

---------

cmyk


दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि. २४ मार्च २०२६


## थोडक्यात


### मनवा वाव्हळचे नवोदय परीक्षेत यश

वडवणी । प्रतिनिधी

खोलेश्वर विद्यालय दिंद्रुड येथील विद्यार्थिनी तसेच वडवणी येथील ज्येष्ठ पत्रकार सुभाषराव वाव्हळ यांची नात व सहशिक्षक ज्ञानेश्वर सुभाषराव वाव्हळ यांची मुलगी कु.मनवा ज्ञानेश्वर वाव्हळ हिने नुकत्याच जाहीर झालेल्या नवोदय विद्यालय प्रवेश पूर्व परीक्षेत दैदिप्यमान असे यश मिळवत संपूर्ण जिल्ह्यातून या परीक्षेत १७ व्या रँकनूसार व ९७ टक्के गुणांसह नवोदय विद्यालयातील आपल्या प्रवेशासाठी ती पात्र ठरली आहे. तिच्या या यशाबध्दल तिचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.



शिक्षण क्षेत्रामध्ये अतिशय प्रतिष्ठित अशा समजल्या जाणाऱ्या व केंद्र सरकारच्या अधिपत्याखाली असलेले बीड जिल्ह्यातील एकमेव असलेल्या नवोदय विद्यालय गढी या विद्यालयामध्ये इयत्ता सहावी प्रवेश पूर्व परीक्षा डिसेंबर २०२५ मध्ये संपन्न झाली होती. या परीक्षेचा निकाल मंगळवारी ऑनलाईन पध्दतीने जाहीर झाला. या परीक्षेत माजलगांव तालुक्यातील दिंद्रुड येथील खोलेश्वर विद्यालय याठिकाणी इयत्ता पाचवी वर्गात शिक्षण घेत असलेली कु.मनवा ज्ञानेश्वर वाव्हळ हिने आपल्या गुरुजनांच्या मार्गदर्शनाखाली कुशाग्र बुध्दीमत्तेच्या बळावर परीक्षेत दैदिप्यमान असे यश मिळवत संपूर्ण जिल्ह्यातून या परिक्षेत १७ व्या रँकनूसार व ९७ टक्के गुणांसह नवोदय विद्यालयातील आपल्या प्रवेशासाठी ती पात्र ठरली आहे. कु.मनवा ही वडवणी येथील दै.झुंजार नेताचे पत्रकार सुभाषराव वाव्हळ यांची नात व सहशिक्षक ज्ञानेश्वर सुभाषराव वाव्हळ यांची मुलगी आहे. तिच्या या यशामागे तिचे कुटुंबीय पालक तसेच आजवर तिला प्रत्येक ठिकाणी उत्कृष्ट मार्गदर्शक म्हणून लाभलेले किर्ती बाल शिक्षण केंद्र, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामबाग वडवणी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोन्नाखोटा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भोटानाईक तांडा, राजमाता मार्गदर्शन केंद्र वडवणी, व खोलेश्वर विद्यालय दिंद्रूड येथील तिचे सर्व गुरुजन वर्ग यांचे परिश्रम आहेत. या यशाचे सर्व श्रेय त्यांनाच जाते. तिच्या यशाबध्दल तिचे शाळेतील सर्व गुरुजन वर्ग तसेच वडवणी व तालुक्यातील पत्रकारिता, शिक्षण क्षेत्रासह सर्वच क्षेत्रातील त्यांचे स्नेहीजन यांनी कु.मनवा हिचे अभिनंदन करुन तिला तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.



### वाणीदोषग्रस्त १५३ बालकांपैकी केवळ २५ वर शस्त्रक्रिया

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील प्राथमिक शाळा व अंगणवाडीतील वाणीदोष असलेल्या बालकांवर आष्टी ग्रामीण रुग्णालयात नुकत्याच शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडल्या. एकूण २५ बालकांवर या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत शालेय आरोग्य तपासणी मोहिमेद्वारे तालुक्यात सर्वेक्षण करण्यात आले होते. या सर्वेक्षणात प्राथमिक शाळांतील ११३ तसेच अंगणवाडीतील मिळून एकूण १५३ विद्यार्थी वाणीदोषग्रस्त असल्याचे निष्पन्न झाले होते. या सर्व बालकांना शस्त्रक्रियेसाठी ग्रामीण रुग्णालयात आणण्याबाबत गटशिक्षण कार्यालय व एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयाला कळविण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात केवळ २५ बालकांचे पालकच शस्त्रक्रियेसाठी उपस्थित राहिल्याचे समोर आले आहे.ही शस्त्रक्रिया लहान असली तरी अत्यंत महत्त्वाची असून बालकांना स्पष्ट विना अडखळता बोलता यावे यासाठी उपयुक्त ठरते. आष्टी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. रामदास मोराळे यांच्यासह वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पथकाने ही शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केली. दरम्यान, उर्वरित बालकांच्या पालकांनी या शस्त्रक्रियेबाबत पुरेशी माहिती न मिळाल्याने उपस्थिती कमी राहिली का, की पालकवर्ग अजूनही आरोग्याबाबत जागरूक नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. अंगणवाडी व प्राथमिक शाळांमधील एकूण १५३ वाणीदोषग्रस्त विद्यार्थी आढळून आले असताना केवळ २५ बालकांवर शस्त्रक्रिया पार पडली. उर्वरित पालकांपर्यंत शिबिराची माहिती पोहोचली नसल्यास ही गंभीर बाब आहे.

प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, (सदस्य, रुग्ण कल्याण समिती, ग्रामीण रुग्णालय आष्टी)

# लुखेगाव मनुर-माजलगाव रस्ता की मृत्यूचा सापळा?

## खड्ड्यांच्या साम्राज्यामुळे नागरिक हैराण; लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे संतापाची लाट

माजलगाव । प्रतिनिधी

ग्रामीण भागाच्या विकासाच्या गप्पा मारणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या दाव्यांची लक्तरे लुखेगाव ते माजलगाव या रस्त्यावर टांगलेली पाहायला मिळत आहेत. हा रस्ता आता केवळ रस्ता उरला नसून तो प्रवाशांसाठी 'मृत्यूचा सापळा' बनला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, जागोजागी पडलेले भगदाड आणि उखडलेली खडी यामुळे वाहनधारकांना अक्षरशः मृत्यूच्या दाढेतून प्रवास करावा लागत आहे. ''रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता?'' असा संतप्त सवाल आता या भागातील ग्रामस्थ विचारू लागले आहेत.







लुखेगाव ते माजलगाव हा रस्ता या परिसरातील अनेक गावांसाठी दळणवळणाचा मुख्य दुवा आहे. मात्र, सध्या या रस्त्याची स्थिती पाहता येथे डांबराचा लवलेशही उरलेला नाही. रस्त्यावर पसरलेल्या मोठ्या अनकुचीदार दगडांमुळे (खडीमुळे) दुचाकीस्वारांचे घसरून पडण्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. अनेक वेळा गंभीर अपघात होऊन नागरिक जखमी झाले आहेत, तर काहींना कायमचे अपंगत्व आले आहे. पावसाळ्यात तर या रस्त्याची अवस्था नरकयातनांहुनही वाईट होते. चिखल आणि साचलेल्या पाण्यामुळे खड्ड्यांचा अंदाज येत नाही, परिणामी वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे.

शाळेत जाणारी मुले, रुग्णवाहिका आणि शेतमाल घेऊन जाणारी वाहने यांना या रस्त्यावरून जाताना कमालीचा त्रास सहन करावा लागतो. एखादा रुग्ण गंभीर असेल, तर त्याला वेळेवर दवाखान्यात पोहोचवणे म्हणजे जणू अग्नीपरीक्षाच ठरत आहे. रस्त्याच्या या दुरवस्थेमुळे रिक्षा आणि टॅक्सी चालकांनी या भागात येण्यास नकार दिला आहे, ज्याचा थेट फटका सर्वसामान्यांच्या खिशाला बसत आहे.

या गंभीर समस्येकडे स्थानिक लोकप्रतिनिधींचे पूर्णतः दुर्लक्ष झाल्याचे चित्र आहे. निवडणुका आल्या की मत मागण्यासाठी हात जोडून येणारे पुढारी आता या चिखलाच्या रस्त्यावरून जायला तयार नाहीत. कोट्यवधींचा निधी रस्त्यांसाठी मंजूर झाल्याच्या घोषणा फक्त कागदावरच राहतात की काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. वारंवार निवेदने देऊनही आणि आंदोलनाचा इशारा देऊनही प्रशासनाकडून केवळ आश्वासनांची बोळवण केली जात आहे.

या संदर्भात संताप व्यक्त करताना स्थानिक शेतकरी म्हणाले की, ''आमच्या पाचवीला पूजलेल्या या त्रासाला आता कोण वाचा फोडणार? या रस्त्यामुळे आमची नवी वाहने दोन वर्षांतच भंगार झाली आहेत. आजारी माणसाला नेताना जीव मुठीत धरावा लागतो. जर लवकर रस्ता झाला नाही, तर आम्ही लोकप्रतिनिधींना गावात पाय ठेवू देणार नाही.''

तसेच, गावकरी वाजेद पठाण यांनी प्रशासनावर ताशेरे ओढताना सांगितले की, ''लुखेगाव-माजलगाव रस्त्याची अवस्था म्हणजे प्रशासकीय अनास्थेचा कळस आहे. इथल्या खड्ड्यांनी आतापर्यंत अनेकांचे रक्त सांडले आहे. लोकप्रतिनिधींना जनतेच्या जीवापेक्षा स्वतःची विकासकामे महत्त्वाची वाटत आहेत का? आम्ही आता केवळ चर्चा करणार नाही, तर तीव्र रस्ता रोको आंदोलन छेडू.''

नागरिकांच्या सहनशक्तीचा अंत आता संपत आला आहे. खराब रस्त्यामुळे होणारे हाल, वाहनांची होणारी मोडतोड आणि वेळेचा अपव्यय यामुळे जनतेमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. या रस्त्याचे काम तातडीने सुरू करून तो दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावा, अशी मागणी लुखेगाव आणि परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे.

## शासनाकडील जाहिरातीच्या थकीत बिलासाठी डॉ.ढवळे यांचे आंदोलन

बीड । प्रतिनिधी

एकीकडे शासन पारदर्शकतेचे दावे करत असताना, बीड जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणा मात्र स्थानिक वृत्तपत्रांच्या जाहिरातींची बिले अडवून त्यांची आर्थिक कोंडी करण्याचा प्रयत्न जिल्हा प्रशासनाकडून होत असुन गळचेपी करत आहे .जिल्ह्यातील विविध भूसंपादन कार्यालयांमार्फत देण्यात आलेल्या जाहिरातींची सुमारे ५० लाख रुपयांची देयके तब्बल १० वर्षांपासून प्रलंबित असल्याने संताप व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली आज (दि.२३, सोमवार) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनोखे 'गोट्या खेळत' लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. ''जिल्हा प्रशासन गोट्या खेळतंय काय?'' असा सवाल करत प्रशासनाचा निषेध नोंदवण्यात आला. दफ्तर दिरंगाई करणा-या आधिका-यांवर प्रशासकीय व दंडात्मक कारवाईची मागणी करण्यात आली.



यावेळी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच पालकमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदन सादर करण्यात आले. बीड जिल्ह्यातील विविध शासकीय प्रकल्पांसाठी भूसंपादन प्रक्रियेदरम्यान कायदेशीर जाहिराती स्थानिक वृत्तपत्रांत प्रसिद्ध केल्या जातात. मात्र या जाहिरातींचे पैसे वेळेत न दिल्याने मोठा निधी अडकून पडला आहे.

विशेष म्हणजे, सन २०२१ ते २०२४ दरम्यान भूसंपादन कार्यालयाकडून मंत्रालयाकडे पाठवलेल्या प्रस्तावांमध्ये तांत्रिक त्रुटी निदर्शनास आणून ते प्रस्ताव परत पाठवण्यात आले. परंतु संबंधित अधिकाऱ्यांनी त्या त्रुटी दूर करून प्रस्ताव पुन्हा सादर करण्याबाबत उदासीनता दाखवली. परिणामी गेल्या ३-४ वर्षांपासून प्रस्ताव प्रलंबित आहेत.

**वृत्तपत्रांची आर्थिक कोंडी**

प्रलंबित देयकांमुळे स्थानिक वृत्तपत्रांची आर्थिक स्थिती डळमळीत झाली आहे. वारंवार निवेदने, पाठपुरावा आणि आंदोलने करूनही केवळ आश्वासने मिळाली; प्रत्यक्ष निधी मात्र मिळालेला नाही. त्यामुळे पत्रकारिता क्षेत्रावरच आर्थिक संकट ओढवल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. या आंदोलनात माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस चऱ्हाटकर, सुदाम तांदळे, मुबीन शेख, पांडुरंग हराळेतसेच बाळासाहेब मोरे पाटील (प्रदेशाध्यक्ष, शिवशक्ती-भिमशक्ती विचारमंच), सादेक सय्यद (शहराध्यक्ष, आम आदमी पार्टी - बीड), रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष, इंटक) , सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे, किष्किंधा पांचाळ ( अध्यक्ष विश्वकल्याण सेवा भावी संस्था बीड)आदी सहभागी झाले होते.

## पान ६ वरुन...

### हजारो भाविकांच्या साक्षीने

हे मोठ्या अट्टहासाने खतपाणी घालत आहेत. प्रति वर्षाप्रमाणे चालत आलेल्या या सप्ताहाचे आरंभ आज महंत जनार्दन महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली पुष्पवृष्टीने झाला आहे. या पुष्पवृष्टीच्या कार्यक्रमाला

हभप.महंत जनार्दन महाराज यांच्यासह महंत रामेश्वर महाराज शास्त्री ( ब्रम्हनाथ संस्थान येळब ) महंत हनुमान महाराज शास्त्री ( सालसीद संस्थान मिडसांगवी) महंत सुरेशानंद महाराज शास्त्री( श्री क्षेत्र श्रृंगऋषि गड ) हभप. रामायणाचार्य उद्धव महाराज चोले, तीर्थराज महाराज पठाडे, हनुमान महाराज सवासे,वेदमूर्ती महेश देवा शास्त्री,भास्कर देवा मुळे, जालिंदर महाराज झिरपे, नाशिकेत महाराज जरे, लक्ष्मण महाराज जरांगे, आदी संत -महंत वारकरी मंडळी सह माजी जिप सदस्य रामराव खेडकर, चेअरमन अर्जुन बप्पा खेडकर, माजी सरपंच रमेश तळेकर, माजी देविदास गर्कळ, सरपंच संदिपान दातखिळ आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

### बीड पोलिस दलाकडून

झाले, संशयास्पद हालचालींवर तत्काळ कारवाई करणे शक्य झाले व नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली. भविष्यात अशा अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे मोठ्या धार्मिक यात्रा, उत्सव व सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये अधिक सक्षम सुरक्षा व्यवस्था उभारणे, गुन्हे प्रतिबंध व तपास प्रक्रियेला गती देणे तसेच स्मार्ट पोलिसिंगला चालना देणे शक्य होणार असून बीड जिल्ह्यात सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी ही मोबाईल कंट्रोल व्हॅन अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

### माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांना

हाताचा कोयता कायमचा बंद होऊन आपली जमीन पाणीदार व्हावी, हेच आमचे स्वप्न आहे. पुरस्कारामुळे आपली जबाबदारी अधिक वाढल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. विकासासाठी जात, धर्म आणि पंथ बाजूला सारून सर्वांना सोबत घेऊन जिल्ह्याच्या प्रगतीसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. जिल्ह्यात अजूनही अनेक कामे होणे बाकी आहेत आणि ती पूर्ण करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. तुमच्या प्रेमाची जी शिदोरी माझ्याकडे आहे, त्या जोरावर मी या जबाबदाऱ्या समर्थपणे पेलण्यास तयार आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त करून यावेळी त्यांनी नाव न घेता विरोधकांवरही टीका केली. काही लोक केवळ वरवरचे मुखवटे धारण करून भ्रम निर्माण करत आहेत, मात्र जनतेने चांगल्या-वाईटाची पारख केली पाहिजे, असेही आवाहन त्यांनी केले. याशिवाय रो.हरीष मोटवानी, रो.मोतिपवळे, रो.मयंक गांधी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी बाबुशेठ लोढा, सुधाकर मिसाळ, भास्कर जाधव, सखाराम मस्के, अशोक शेटे, प्रकाश कानगांवकर, अर्जुन बहिरवाळ, राणा चौव्हान, विजय सरवदे, सुर्यकांत महाजन, विशाल क्षीरसागर, प्रमोद करमाळकर, विष्णुदास बियाणी, रामेश्वर कासट, अमोल लहाने, डॉ.महेंद्र गौशाल, डॉ.अरूण भस्मे, किशोर पगारिया, लक्ष्मीकांत सोनी, सुरेंद्र कासट, मनमोहन कलंत्री, जवाहर कांकरिया, राहूल बोरा, रो.सुमित जयस्वाल, रो.सुरेश लड्डा, रो.वाय जनार्दनराव, रो.संतोष पवार, रो.मुकुंद कदम, रो.मेघराज पिंगळे, सुहास बेदरे, गणेश मुळे, संदिप खोड, ओमप्रकाश लोहिया, राम मोटवानी, सुरज लाहोटी, विवेक बडगे, प्रमोद धारवाडकर, कल्याण कुलकर्णी, सुनिल खंडागळे, अशोक राऊत यांच्यासह महिला, पुरूषांची उपस्थिती होती.

## राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी मीरा बोरवणकर यांची नियुक्ती करा -रत्नमाला मुंडे

**केज । प्रतिनिधी**

राज्यातील महिलांवरील वाढते अत्याचार आणि सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर असताना, असंख्य महिलावर अत्याचार करणाऱ्या तथाकथित भोंदू बाबाच्या विळख्यात अडकलेल्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी राजीनामा दिल्यामुळे अन्यायाच्या मगर मिठीतून मुक्त झालेल्या राज्य महिला आयोगाचे अध्यक्षपद एका खंबीर आणि अनुभवी व्यक्तीकडे सोपवण्यात यावे, अशी मागणी जोर धरू लागली असतानाच शिवसेना महिला आघाडीच्या संपर्कप्रमुख सौ.रत्नमाला मुंडे यांनी माजी आयपीएस अधिकारी मीरा बोरवणकर यांच्या नावाची शिफारस केली असून, बोरवणकर यांच्यासारख्या कर्तव्यदक्ष व अनुभवी महिला अधिकाऱ्यामुळेच पिडीत महिलांना खऱ्या अर्थाने न्याय मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.बोरवणकर यांच्या नावाची शिफारस करण्याची कारणे सांगताना सौ.रत्नमाला मुंडे यांनी आपल्या मागणीत मीरा बोरवणकर यांच्या कामाचा गौरव केला आहे. त्या म्हणाल्या की,



मीरा बोरवणकर यांनी पोलीस दलात काम करताना अनेक गुंतागुंतीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. विशेषतः महिला आणि बालकांवरील अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये त्यांनी घेतलेली कठोर भूमिका वाखणण्याजोगी आणि संपूर्ण महाराष्ट्राच्या स्मरणात आहे.तसेच बोरवणकर यांची ओळख एक निर्भीड आणि खमक्या अधिकारी म्हणून आहे. महिला आयोगासारख्या महत्त्वाच्या संस्थेला अशाच कणखर नेतृत्वाची गरज आहे, जे कोणाच्याही दबावाखाली न येता पिडीतांना न्याय मिळवून देईल. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, आयपीएस अधिकारी म्हणून मीरा बोरवणकर यांनी कायदा आणि सुव्यवस्थेचे बारकावे जवळून पाहिले आहेत, ज्याचा फायदा आयोगाच्या कामकाजात चांगल्या प्रकारे होईल. सरकारने आता तरी राजकीय पुनर्वसनापेक्षा कामाला प्राधान्य द्यावे अशी ही मागणी त्यांनी केली.

## नागझरी गोदापात्रातून बेसुमार अवैध वाळू उपसा

### ॲड.नारायण शिंदे यांनी घेतला 'जलसमाधी' घेण्याचा पवित्रा

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील नागझरी गोदावरी नदीपात्रात रात्रंदिवस केणी, हायवा यांच्या साहाय्याने अवैध वाळू उपसा जोरात सुरू असल्याची गंभीर तक्रार शिवसेना उपजिल्हाप्रमुख ॲड. नारायण आप्पासाहेब शिंदे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. या अवैध उपशामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असून, महसूल प्रशासन मात्र डोळे झाक करत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

ॲड. शिंदे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेवराई तहसीलदार आणि तलाठी यांना वारंवार फोन करून अवैध उपसा थांबवण्याची विनंती केली, तरीही कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. उलट तहसीलदार फोन उचलत नाहीत आणि वाळू माफियांना अभय देत असल्याचा दावा केला. ''फोन केला तर वाळू माफिया आमच्या अंगावर पाठवतात, ज्यामुळे माझ्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. काही बरे-वाईट झाले तर तहसीलदार जबाबदार राहतील,'' असे ते म्हणाले.याशिवाय घरकुल धारकांच्या नावे ओटीपीद्वारे अवैध वाळू उपसा चालू असल्याचा गंभीर आरोप करताना, ग्रामसेवक-तलाठी यांच्याकडून अँगल कॅम आणि फोटोसह पंचनामा घेण्याची मागणी केली. यातून तहसीलदारांनी किती मोठ्या प्रमाणात अवैध विक्री केली याचे उघड होईल, असा दावा आहे.

सर्वात धक्कादायक म्हणजे, अवैध उपसा तात्काळ थांबवला नाही तर दि. १ एप्रिल २०२६ रोजी गोदावरी नदीपात्रात जलसमाधी घेणार असल्याची भीषण धमकी ॲड. शिंदे यांनी दिली आहे. ''याची सर्वस्वी जबाबदारी महसूल प्रशासनाची राहील,'' असे ते म्हणाले.या निवेदनाच्या प्रती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा पवार, विभागीय आयुक्त आणि पोलीस अधीक्षक यांना पाठवण्यात आल्या आहेत.

गेवराई तालुक्यातील गोदावरी नदीत अवैध वाळू उपसा ही जुनी समस्या असून, यापूर्वीही अनेकदा कारवाया झाल्या आहेत. मात्र, माफियांचा दबाव वाढत असल्याने प्रशासनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. या प्रकरणात तातडीने कारवाई होईल की नाही, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

# कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये आदित्य शिक्षण संस्थेच्या १४ विद्यार्थ्यांची निवड

## झायडेक्स इंडस्ट्रीजमध्ये नोकरीची संधी; आकर्षक पॅकेजसह करिअरला नवी दिशा

बीड । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या आदित्य शिक्षण संस्थेने कॅम्पस इंटरव्ह्यूत पुन्हा एकदा यशाचा मानाचा तुरा रोवला आहे. ६० विद्यार्थ्यांमधून १४ विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीत निवड होऊन संस्थेच्या गुणवत्ता व मार्गदर्शनाची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. आदित्य कृषी व कृषी जैवतंत्रज्ञान शाखेत १८ मार्च रोजी आयोजित कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये वडोदरा येथील झायडेक्स इंडस्ट्रीज प्रा. लि. या नामांकित कंपनीने १४ विद्यार्थ्यांची निवड केली.

संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेमध्ये सातत्याने विविध उपक्रम राबवले जात आहेत. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना आणि शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मोठा लाभ मिळत आहे. शिक्षणाबरोबर त्यांच्या करिअरसाठी आदित्य शिक्षण संस्था सतत उपक्रमशील असते. या कॅम्पस ड्राईव्हमध्ये आदित्य कृषी शाखेतील १२ विद्यार्थी हर्षवर्धन शेळके,सुशांत मुंडे,अमेय गावंडे, सुनील मदने,सचिन धुमाळ, तेजस लाटे,संग्राम तनपुरे,दयानंद शिरसाट, आकाश लांडे,वैभव भावने, अनंता वासू,रेहान सय्यद व आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान शाखेतील दोन विद्यार्थी सचिन राठोड आणि सौरभ जानकर , असे एकूण १४




विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. या यशामुळे संपूर्ण संस्थेत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा, आदित्य कृषी शाखेचे प्राचार्य शामजी भुतडा, आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान शाखेचे प्राचार्य डॉ. सतीश कचरे, तसेच प्लेसमेंट अधिकारी प्रा. प्रिया गव्हाणे यांनी केले. यावेळी शाखेतील प्राध्यापक व शिक्षकांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**१ महिन्याचे विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षण मिळणार**

कॅम्पस इंटरव्ह्यूत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना १ मेपासून वडोदरा येथे एक महिन्याचे विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यानंतर महाराष्ट्र व गुजरात या राज्यांमध्ये नोकरी करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. कंपनीकडून आकर्षक पॅकेजसह करिअरची उत्तम संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे

**कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये निवड झालेले विद्यार्थी काय म्हणतात**

**महाविद्यालयातील नियमित मार्गदर्शनामुळे माझा आत्मविश्वास खूप वाढला**

आदित्य कृषी महाविद्यालयात शिकताना मला केवळ पुस्तकातील ज्ञानच नाही, तर प्रत्यक्ष कामाचा अनुभवही मिळाला. प्रॅक्टिकल ट्रेनिंग आणि नियमित मार्गदर्शनामुळे माझा आत्मविश्वास खूप वाढला. कॅम्पस ड्राईव्हमध्ये सहभागी होताना भीती वाटत होती, पण शिक्षकांनी दिलेल्या मार्गदर्शनामुळे मी इंटरव्ह्यू आत्मविश्वासाने दिला. झेडस कंपनीत माझी निवड होणे हा माझ्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. या यशामागे महाविद्यालय आणि शिक्षकांचे मोठे योगदान आहे.

-दयानंद सिरसाट, विद्यार्थी

### टीसी हरवली आहे

लक्ष्मी अशोक खरात या नावाची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिरनेर ता. अंबड जि. जालना या शाळाची टीसी छत्रपती संभाजीनगर अंबड प्रवास दरम्यान टीसी हरवली आहे सापडल्यास या नंबर वर संपर्क करावे ९१४५०१५६४४

---

# युद्धामुळे खरीप हंगामात खतांची टंचाई केआरएज रेटिंग्जच्या अहवालात इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

**पश्चिम आशियातील सुरु असलेल्या तणावामुळे प्रमुख व्यापारी मार्गात अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे आगामी खरीप हंगामात शेतकऱ्यांना खत टंचाईचा सामना करावा लागू शकतो, असा इशारा केआरएज रेटिंग्जने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या अहवालात दिला आहे.**



या अहवालानुसार, ''भारताची २६ टक्के खतांची आयात पश्चिम आशिया देशांमधून होते. परंतु सध्या इस्त्रायल-अमेरीका आणि इराणमधील युद्धामुळे जगातिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. त्यामुळे खरीप हंगामाच्या पूर्वीच खत आयात अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. त्याचा शेतकऱ्यांना फटका बसू शकतो.'' असा इशाराही या अहवालात देण्यात आला आहे. भारत सर्वाधिक खतांची आयात पश्चिम आशिया देशांमधून करतो. यामध्ये पश्चिम आशियाचा २६.२ टक्के वाटा आहे. तर त्याखालोखाल जॉर्डनमधून १९.२ टक्के, रशियामधून १५.५ टक्के खतांची आयात करतो. तर उर्वरित आयातीमध्ये मोरोक्काचा १०.४ टक्के, चीनचा ५.७ टक्के, इजिप्तचा ५.६ टक्के, कॅनडाचा ३.८ टक्के आणि इतर देशांचा १० टक्के वाटा आहे, असेही या अहवालात नमूद करण्यात आले आहे. पश्चिम आशियातील तणावामुळे होर्मुझ सामुद्रधुनीमार्गे होणारा व्यापार विस्कळीत झाला आहे. या सामुद्रधुनीतून ऊर्जाचा व्यापार मोठ्या प्रमाणात होतो. त्यामुळे हा जागतिक व्यापारासाठी एक महत्त्वाचा जलमार्ग ठरतो. परंतु सध्याच्या तणावाच्या स्थितीमुळे वाहतूक विस्कळीत झाली आहे. त्यामुळे खरीप हंगामात शेतकऱ्यांना खत टंचाईचा सामना करावा लागू शकतो. त्यातच एल-निनोच्या संभाव्य अंदाजामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढू शकते, असे या अहवालात सांगितले आहे. खत तयार करण्यासाठी लागणाऱ्या एलएनजी गॅसच्या किमतीत मोठी वाढ होत असून पुरवठ्यात अडथळे निर्माण झाल्यामुळे खतांच्या किमती वाढू शकतात. त्यामुळे सरकारकडून दिल्या जाणाऱ्या अनुदानाचा भारही वाढण्याची शक्यता आहे, असे या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. २०२५ च्या पहिल्या सहामाहीत होर्मुझ जलमार्गातून जाणाऱ्या कच्च्या तेलापैकी सुमारे ८९ टक्के तेल चीन, भारत, जपान आणि दक्षिण कोरिया या आशियाई देशांना देण्यात आले आहे. तसेच भारताच्या एकूण कच्च्या तेल आयातीपैकी जवळपास ४० टक्के आयात हाच मार्ग वापरून होते, त्यामुळे या प्रदेशावर भारताचे अवलंबित्व असल्याचे अहवालात म्हटले आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१३०७ : देवगिरीचा वैभवशाली सम्राट रामदेवराव यादव यास मलिक काफूरने कैद करुन दिल्लीला नेले. चैत्र व. ४
१६७७ : दक्षिण दिग्विजयप्रसंगी शिवाजी महाराजांनी श्री शैल्य मल्लिकार्जुन येथे मुक्काम केला.
१८५५ : आग्रा आणि कलकत्ता यांदरम्यान तारसेवा सुरू झाली.
१८३६ : कॅनडा देशाने आफ्रिकन कॅनेडियन लोकांना मतदानाचा अधिकार दिला.
१८३७ : कॅनडा देशातील अश्वेत नागरिकांना मतदान करण्याचा अधिकार मिळाला.
१८८३ : शिकागो व न्यूयार्क या दोन शहरादरम्यान सर्वप्रथम दूरध्वनीवर बोलचाल करण्यात आली.
१८९६ : अ.एस. पोपोव यांनी इतिहासात पहिल्यांदाच रेडिओ सिग्नल चे प्रसारण केले.
१९२३ : ग्रीस हे राष्ट्र प्रजासत्ताक बनले.
१९२९ : लाहोर काँग्रेसचे ऐतिहासिक अधिवेशन
१९६२ : जागतिक क्षय रोग दिन
१९७७ : मोरारजी देसाई यांचा भारताचे पंतप्रधान म्हणून शपथविधी झाला व काँग्रेसची तीस वर्षाची सत्ता संपुष्टात झाली.
१९९३ : शूमाकर-लेव्ही-९ या धूमकेतुचा शोध लागला. हा धूमकेतु जुलै महिन्यात गुरु ग्रहावर जाऊन आदळला.
१९९८ : 'टायटॅनिक' चित्रपटाला विक्रमी ११ ऑस्कर पुरस्कार मिळाले.
२००८ : भूतान हे लोकशाही राष्ट्र बनले व प्रथमच निवडणुका घेण्यात आल्या.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७५ : मुथुस्वामी दीक्षीतार  तामिळ कवी व संगीतकार (मृत्यू: २१ आक्टोबर १८३५)
१७९३ : कागदी चलनाचे जनक समजले जाणारे थॉमस रुझवेल्ट.
१८४१ : ब्रिटीश भारतातील मुस्लीम राजनेता व भारतीय मुस्लीम लीगचे संस्थापक नवाब विकार-उल-मुल्क कबोह यांचा जन्मदिन. यांचे मुळ नाव मुश्ताक हुसेन झुबेरी असून त्यांना नवाब विकार-उल-मुल्क मौलवी या नावाने देखील ओळखले जाते.
१८६३ : ब्रिटीश भारतातील एक प्रख्यात वकील आणि राजकारणी सत्येंद्र प्रसन्न सिन्हा यांचा जन्मदिन.
१८९२ : भारतीय राजनेता आणि भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्ता हरिभाऊ उपाध्याय यांचा जन्मदिन. सन १९५२-५६ साली त्यांनी अजमेर राज्याचे मुख्यमंत्री पद भूषविले होते.
१९०१ : अमेरिकन ॲनिमेटर मिकी माऊस चे सह निर्माते अनब्लॉक आय्व्रेक्स यांचा जन्म. (मृत्यू: ७ जुलै १९७१)
१९२२ : भारतीय कर्नाटिक संगीतकार तसेच तमिळ चित्रपटसृष्टीतील पार्श्वगायक थोगुलुवा मीनाची अयंगर सौन्दराराजन उर्फ टीएमस यांचा जन्मदिन.
१९२४ : ज्ञानपीठ विजेते बिरेंद्रकुमार भट्टाचार्य.
१९३० : स्टीव्ह मॅकक्वीन  हॉलिवूड अभिनेता (मृत्यू: ७ नोव्हेंबर १९८०)
१९५१ : टॉमी हिल्फायगर  अमेरिकन फॅशन डिझायनर
१९६५ : अमेरिकन प्रोफेशनल रेसलर व सध्या डब्ल्यूडब्ल्यूई रेसलिग स्पर्धेत कार्यरत असलेले अंडरटेकर या नावाने ओळखले जाणारे मार्क विल्यम कॅलवे यांचा जन्मदिन.
१९६६ : भारतीय राजकारणी व उद्योगपती जयदेव गल्ला यांचा जन्मदिन.
१९७९ : हिंदी चित्रपट अभिनेता इमरान हाशमी यांचा जन्मदिन.
१९८४ : भारतीय हॉकी खेळाडू एड्रियन डिसूझा यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६०३ : एलिझाबेथ पहिली, इंग्लंडची राणी.
१८४९ : योहान वुल्फगँग डोबेरायनर  जर्मन रसायनशास्त्रज्ञ (जन्म: १३ डिसेंबर १७८०)
१८८२ : एच. डब्ल्यू. लाँगफेलो  अमेरिकन नाटककार व कवी (जन्म: २७ फेब्रुवारी १८०७)
१९०५ : ज्यूल्स व्हर्न  फ्रेन्च लेखक (जन्म: ८ फेब्रुवारी १८२८)
२००७ : श्रीपाद नारायण पेंडसे  मराठी कथालेखक व कादंबरीकार (जन्म: ५ जानेवारी १९१३)

# कामगंध सापळा: आधुनिक कीड व्यवस्थापनातील शाश्वत जैविक उपाय

**भारतीय शेती ही एक बहुआयामी व्यवस्था आहे, जिथे निसर्गाशी जुळवून घेत शेती करणं ही काळाची गरज ठरते. आज शेतकऱ्याला जिथं उत्पादनात सातत्य आणि उत्पन्न वाढीचा प्रश्न आहे, तिथे दुसरीकडे हवामान बदल, जमिनीची गुणवत्ता आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे पिकांवरील कीड व रोगांचा वाढता प्रकोप ही मुख्य आव्हानं बनली आहेत.**



शेतकरी वर्गाने आजपर्यंत अनेक रासायनिक उपाय वापरले. काही ठिकाणी तात्पुरतं यश मिळालं पण दीर्घकाळात जमिनीची उत्पादकता, जैवविविधता आणि पर्यावरण यावर त्याचे अप्रत्याशित दुष्परिणाम दिसून आले. अशा वेळी शाश्वत व पर्यावरणपूरक उपायांचा शोध घेत असताना एक अत्यंत प्रभावी तंत्रज्ञान पुढे येते ते म्हणजे कामगंध सापळा. हा सापळा केवळ कीड नियंत्रणासाठीच नाही, तर त्याच्या माध्यमातून आपण रासायनिक कीटकनाशकांचा वापर ५० ते ७०% पर्यंत कमी करू शकतो. यामुळे केवळ खर्च कमी होत नाही तर, माणसाचे आरोग्य, मातीचा पोत, आणि उत्पादनाची गुणवत्ता टिकवून ठेवता येते.

**कामगंध म्हणजे काय?**

''कामगंध'' हा एक प्रकारचा रासायनिक संदेशवाहक आहे, जो कीटकांच्या शरीरातून उत्सर्जित होतो. विशेषतः मादी कीटक नरांना आकर्षित करण्यासाठी विशिष्ट सुगंधाचे अणु हवेत सोडते, ज्यामुळे नर कीटक तिच्याकडे आकृष्ट होतो. हाच नैसर्गिक सिग्नल वैज्ञानिक पद्धतीने प्रयोगशाळांमध्ये कृत्रिमरीत्या तयार केला जातो आणि प्लास्टिक/कागदाच्या सापळ्यांमध्ये ठेवला जातो, जेणेकरून त्या विशिष्ट कीटकाचे नर सापळ्यात अडकतात.या प्रक्रियेमुळे त्या कीटकांची प्रजनन साखळी खंडित होते आणि त्यांचा प्रादुर्भाव नियंत्रणात येतो.

**कामगंध सापळ्याचे प्रमुख उद्दिष्टे :**

कीटक संख्येवर नियंत्रण मिळवणे. कीड प्रकाराची लवकर ओळख करून प्रभावी उपाय योजना करणे. रासायनिक कीटकनाशकांचा पर्याय. जैविक शेतीला चालना देणे. उत्पादन सुरक्षित ठेवणे.

**कामगंध सापळ्याचा वापर कधी आणि कसा करावा?**

पेरणीनंतर १० दिवसांनी सापळे लावायला सुरुवात करा. सुरुवातीसच मादी कीड नराशी संलग्न होण्यापूर्वी अडवणे महत्त्वाचे. एक एकरात ५ ते १० सापळे पुरेसे असतात. जर कीड जास्त असेल तर संख्या वाढवावी.

प्रत्येक २०-२५ दिवसांनी फेरोमोन कॅप्सूल बदलावा. गरजेनुसार अधिक वेळेसही बदल करता येतो. सापळा झाडाच्या फांद्यांच्या समांतर उंचीवर लावा. वाऱ्याच्या दिशेनुसार लावल्यास अधिक प्रभावी ठरतो.

**कामगंध सापळ्याचे सखोल फायदे :**

कीटकनाशकांचा वापर कमी होतो. पारंपरिक शेतीमध्ये वारंवार कीटकनाशके फवारावी लागतात, ज्याचा खर्चही जास्त असतो आणि परिणामदायकतेवरही प्रश्नचिन्ह असतो. फेरोमोन सापळ्यामुळे कीटकांचे संख्यात्मक निरीक्षण आणि नियंत्रण होत असल्याने फवारणीची गरज कमी होते. अंदाजे ५०% पर्यंत कीटकनाशक खर्च बचत होते.

**सेंद्रिय शेतीसाठी उत्तम पर्याय:**

ज्या शेतकऱ्यांनी सेंद्रिय प्रमाणपत्र घेण्याचा विचार केला आहे, त्यांच्यासाठी कामगंध सापळा एक महत्त्वाचा जैविक उपाय आहे. हे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी वापरण्यात येणारी हरित नियंत्रण पद्धत म्हणून फेरोमोन सापळा मोलाचा आधार ठरतो. कोणताही रासायनिक वापर नसल्यामुळे माती, पाणी, वायू आणि जैवविविधतेवर कोणताही दुष्परिणाम होत नाही. यामुळे सेंद्रिय शेतीच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकता येते. पर्यावरण स्नेही उत्पादनामुळे शेतमालाला मागणी येऊ शकते.

# उष्ण हवामानात सुद्धा तग धरून राहणारी 'मलबारी शेळी'



भारत हा मुख्यत: उष्णकटिबंधीय प्रदेश आहे. त्यामुळे आपल्याकडे उष्ण वातावरणात जुळवून घेणाऱ्या जनावरांच्या जाती पाळण्यास प्राधान्य दिले जाते. शेळ्यांच्या बाबतीत सांगायचं झाल्यास काही जाती भारतातील उष्ण हवामान कणखरपणे सहन करतात. शेळीची अशीच एक जात म्हणजे मलबारी शेळी. या शेळीला तेलीचेरी शेळी या नावाने सुद्धा ओळखतात.

**उगमस्थान :** मलबारी शेळीचे उगमस्थान केरळ राज्यातील मलबार जिल्हा हे आहे. कदाचित यामुळेच या शेळीला मलबारी शेळी असे नाव पडले आहे. या शेळ्या दूध आणि मांस उत्पादन या दोन्हीसाठी पाळल्या जातात.

**शरीररचना :** मलबारी शेळ्या पांढऱ्या रंगाच्या असतात. यात काही काळ्या शेळ्या सुद्धा आहेत परंतु त्या अत्यंत दुर्मिळ आहेत. या शेळ्यांचे वजन कमी असते, त्यांचे कान व पाय लहान असतात आणि अंडकोष मोठे असतात. मलबारी ही मध्यम ते लहान आकाराची शेळी असून सरासरी उंची आणि शरीराची लांबी अनुक्रमे ६८ आणि ७० सेमी असते. मादी शेळीचे वजन ३० किलोच्या दरम्यान असते तर नराचे वजन ४१ किलो असते.

**प्रजोत्पादन आणि उत्पादन :** मलबारी शेळी ८ व्या महिन्यांत प्रजननक्षम होऊन माजावर येते आणि १२ व्या महिन्यांत पहिले वेत देते. एक निरोगी मलबारी शेळी दर ६ महिन्यांनी २-३  करडांना जन्म देते. मलबारी शेळीच्या करड्यांचे वजन ७ महिन्यांत २०-२२ किलोपर्यंत पोहोचते. शेळ्यांमध्ये जुळे पिल्लू देण्याचे प्रमाण ५०%, तीळे पिल्लू देण्याचे प्रमाण २५%, आणि चार पिल्लू देण्याचे प्रमाण ५% आहे. शेळीची प्रतिदिन दूध देण्याची क्षमता ही साधारणपणे ०.५ ते १.५ लीटर आहे. दूध देण्याचा कालावधी १७८ दिवसांचा असून प्रति वेत ९० लिटर दूध देते.

**इतर वैशिष्ट्ये :** मलबारी शेळ्यांमध्ये रोगप्रतिकारशक्ती जास्त असते आणि ती केरळ राज्यातील उष्ण आणि दमट परिस्थितीशी जुळवून घेते. या शेळ्यांचा वाढीचा दर, दुग्धोत्पादन,आणि पुनरुत्पादन  (किडिंग) क्षमता जास्त आहे. शेळीची मलबारी जात कमी चरबीयुक्त मांसासाठी प्रसिद्ध आहे. या शेळीची त्वचा टॅनिंग/लेदर उद्योगात लोकप्रिय आहे.

# वेलवर्गीय भाज्यांना मंडपाचा आधार




**वेलवर्गीय भाज्या उदा. कारली, दुधी भोपळा, दोडका, घोसाळी, पडवळ या पिकांना वाढीच्या काळात आधार दिल्यास त्यांची वाढ चांगल्याप्रकारे होते. त्यासाठी मंडप किंवा ताटी पद्धती वापरून वेलींना आधार दिला जातो.**

दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण उत्पादन मिळविण्याकरिता वेलींना मंडप किंवा तारेच्या साह्याने वाढविणे गरजेचे असते. आधार दिल्यामुळे नवीन येणाऱ्या फुटींना वाढीसाठी सतत चांगला वाव मिळत राहतो. त्यामुळे फळधारणा चांगली होते. याउलट जमिनीवर पहिले काही फुटवे आल्यानंतर नवीन फुटवे येत नाहीत आणि वेली केवळ एकदाच फळे देतात. मंडपावर चढविलेल्या वेली ६ ते ७ महिने चांगल्या राहतात, तर जमिनीवर केवळ ३ ते ४ महिनेच चांगल्या राहतात. मंडपावर किंवा ताटीवर फळे लोंबकळत राहिल्यामुळे त्यांची वाढ सरळ होते. हवा आणि सूर्यप्रकाश एकसारखा मिळत असल्यामुळे फळांचा रंग एकसारखा आणि चांगला राहतो. फळांचा जमिनीसोबत संपर्क होत नाही. त्यामुळे ओलावा लागून फळ सडण्याचा धोका टाळला जातो. शिवाय कीड व रोगांचे प्रमाणही कमी राहते. फळांची तोडणी, रासायनिक फवारणी ही कामे करणे सुलभ होते. आंतरमशागतीवरील खर्च कमी होतो. वेल मंडपावर पोहोचेपर्यंत दीड ते दोन महिन्यांचा कालावधी जातो. या काळात या पिकांमध्ये पालेभाज्यांसारखी मिश्रपिके घेता येतात.

# उन्हाळी उडीद : कमी दिवसांत अधिक उत्पादन देणारे फायदेशीर पीक

उन्हाळी हंगामात उडीद हे एक महत्त्वाचे डाळी वर्गीय पीक आहे. या पिकाची मागणी मोठ्या प्रमाणात असून, शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरते.



**जमिनीची निवड आणि शेताची तयारी :**

उडीद पीक हलकी, मध्यम ते भारी जमिनीत यशस्वीरीत्या घेतले जाते. चांगला निचरा होणारी जमीन असल्यास अधिक उत्पादन मिळते. मृदाशास्त्रीय दृष्टीने, चोपण, गाळाची, काळी मृदा आणि वालुकामय जमीन अधिक चांगली मानली जाते. जमिनीचा  ६.५ ते ७.५ दरम्यान असावा. अतिशय क्षारयुक्त किंवा पाणथळ जमीन टाळावी. शेताची तयारी करताना सुरुवातीला खोल नांगरणी करून एकदा रोटावेटर किंवा वखर चालवावा. शेवटच्या नांगरणीवेळी प्रति एकर १०-१५ गाड्या चांगले कुजलेले शेणखत टाकावे. यामुळे मृदेत सेंद्रिय घटक वाढतात आणि जमिनीची सुपीकता सुधारते. मोकळ्या अवस्थेत तण निघावे म्हणून १५ दिवस शेत मोकळे ठेवावे व नंतर पेरणी करावी.

**पेरणीचा कालावधी :** उन्हाळी उडीद कोरड्या व उष्ण हवामानात चांगल्या प्रकारे वाढतो. तापमान २५ ते ३५ अंश सेल्सियस दरम्यान असावे. यापेक्षा अधिक तापमान झाल्यास पिकाची वाढ कमी होते, तर कमी तापमान असल्यास उगवण उशिरा होते. महाराष्ट्रात फेब्रुवारी ते एप्रिल महिन्यात उन्हाळी उडीदाची पेरणी केली जाते. या कालावधीत हवामान कोरडे आणि उबदार असल्याने पिकाची वाढ चांगली होते.

**विशेष वैशिष्ट्ये :** उन्हाळी उडीदाचा कालावधी कमी असल्याने शेतकऱ्यांना झटपट उत्पादन मिळते. उडीद हे जलद वाढणारे आणि कमी पाण्यावर येणारे पीक असल्यामुळे हवामान बदलास तोंड देऊ शकते. पीक लवकर तयार होणारे असल्याने दुसऱ्या हंगामासाठी जमिन वेगाने उपलब्ध होते. यामुळेच उन्हाळी उडीद शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरते.

**पेरणी पद्धती :** दोन ओळींमधील अंतर ३० सेंमी. दोन रोपांमधील अंतर १० सेंमी. बियाणे खोली ४ ते ६ सेंमी. बियाणे योग्य खोलीवर पेरल्याने उगवण ८०% पेक्षा जास्त होते आणि चांगल्या प्रकारे अंकुरण होते.

**खत व्यवस्थापन :** उडीद पिकासाठी सेंद्रिय आणि रासायनिक खतांचे संतुलित व्यवस्थापन आवश्यक आहे. नत्र - ८ किलो, स्फुरद - १६ किलो, पालाश -८ किलो, १०-१५ गाड्या शेणखत. पेरणीपूर्वी बियाण्यावर रायझोबियम आणि पीएसबी जिवाणू संवर्धनाची प्रक्रिया करावी. वाढीच्या टप्प्यावर डीएपी ५० किलो प्रति एकर चांगले परिणाम देते.

**सिंचन व्यवस्थापन :** उन्हाळी उडीदासाठी योग्य सिंचन केल्यास उत्पादनात वाढ होते. पहिले पाणी - पेरणीनंतर त्वरित द्यावे. दुसरे पाणी - पेरणीनंतर ८ ते १० दिवसांनी. तिसरे पाणी - फुलोऱ्याच्या अवस्थेत द्यावे. चौथे पाणी - शेंगा भरण्याच्या टप्प्यावर. सिंचनाच्या वेळेस ताण येणार नाही याची दक्षता घ्यावी. थेंब सिंचन प्रणालीचा अवलंब केल्यास पाणी वाचते आणि उत्पादनात वाढ होते.

**तण व्यवस्थापन :** उडीद पिकामध्ये तण नियंत्रण अत्यंत महत्त्वाचे आहे. पहिली कोळपणी पेरणीनंतर २० दिवसांनी. दुसरी कोळपणी  ३० दिवसांनी.

# आयुष्मान-फुले योजना एकत्रीकरणात गोंधळ

## तांत्रिक त्रुटींमुळे पात्र रुग्णांना उपचार नकार, तांत्रिक त्रुटींनी आरोग्य सेवा ठप्प

जालना (प्रतिनिधी)

महाराष्ट्रात केंद्र शासनाची आयुष्मान भारत योजना आणि राज्य शासनाची महात्मा फुले जन आरोग्य योजना यांचे २३ एप्रिल २०२६ पासून एकत्रीकरण करण्यात आले असले तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीत गंभीर तांत्रिक व प्रशासकीय अडचणी निर्माण झाल्याचे समोर आले आहे. या त्रुटींमुळे अनेक पात्र लाभार्थ्यांना उपचार नाकारले जात असल्याची गंभीर बाब पुढे आली असून याबाबत केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी.नड्डा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर व जिल्हाधिकारी, जालना यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.

शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष आर.व्ही.छल्लारे यांनी सादर केलेल्या निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, योजनांच्या एकत्रीकरणाचा उद्देश नागरिकांना ५ लाख रुपयांपर्यंत मोफत व सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे हा असला तरी प्रत्यक्षात रुग्णालयांकडून आयुष्मान भारत कार्ड सादर करण्याची सक्ती केली जात आहे. संबंधित रुग्णाचे नाव ऑनलाईन पोर्टलवर उपलब्ध नसल्यास उपचार देण्यास नकार दिला जात असल्याने अनेक पात्र रुग्ण उपचारांपासून वंचित राहत आहेत. राज्यात लाखो नागरिकांना आयुष्मान भारत कार्ड काही तांत्रिक अडचणींमुळे मिळाले नाही. जालना जिल्ह्यात आयुष्मान भारत कार्डचे सुमारे १८.१५ लाखांचे उद्दिष्ट असताना केवळ ७.८७ लाख कार्डचे वितरण झाले आहे. त्यामुळे उर्वरित लाखो नागरिक अद्याप कार्डविना असून आपत्कालीन परिस्थितीत त्यांना योजनांचा लाभ मिळविणे कठीण झाले आहे. तसेच तहसील कार्यालयाच्या पोर्टलवरील नोंदी आणि आरोग्य विभागाच्या पोर्टलमधील माहितीमध्ये मोठी विसंगती असल्याने एनपीएच, एपीएल व शेतकरी कुटुंबातील अनेक पात्र लाभार्थ्यांना वैध कागदपत्रे असूनही उपचार नाकारले जात आहेत. काही ठिकाणी रुग्णालयांकडून नातेवाईकांवर आर्थिक दबाव आणल्याचेही आरोप करण्यात आले आहेत.

या संदर्भात भारतीय राज्यघटनेतील कलम २१ नुसार आरोग्य सेवा हा मूलभूत हक्क असल्याचे अधोरेखित करण्यात आले असून केवळ तांत्रिक कारणांमुळे उपचार नाकारणे हे कायदेशीरदृष्ट्या अयोग्य असल्याचे नमूद करण्यात आले आहे. सदर समस्येचे मूळ कारण विविध शासकीय पोर्टल्समधील डेटा समन्वयाचा अभाव सल्याचे स्पष्ट करण्यात आले असून शासनाने तात्काळ हस्तक्षेप करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनाद्वारे एमर्जन्सी टेलिफोन इंटिमेशन सुविधा पुन्हा सुरू करणे, पात्र लाभार्थ्यांचा डेटा तात्काळ अद्ययावत करणे, तहसील नोंदीच्या आधारे तात्पुरते उपचार मंजूर करणे, आयुष्मान कार्ड सक्ती शिथिल करणे, तसेच जनजागृती मोहीम व विशेष शिबिरे आयोजित करण्याची मागणी करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून शासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

# एन.इलेक्ट्रिकल्स महावितरणच्या कामांतील तक्रारींबाबत चौकशी होणार – राज्यमंत्री बोर्डीकर

जालना । प्रतिनिधी

जालना महावितरणच्या बारामती, पुणे, नाशिक कोल्हापूर परिमंडळांत आर. एन.इलेक्ट्रिकल्स या कंत्राटदाराकडून बनावट बिलिंग, आर्थिक अपहार व निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे अपघात झाल्याबाबत सदस्यांनी उपस्थित केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करण्यात येईल, असे राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी विधानसभेत सांगितले.



सदस्य महेश सावंत यांनी महावितरणच्या बारामती, पुणे, नाशिक कोल्हापूर परिमंडळांत आर. एन.इलेक्ट्रिकल्स या कंत्राटदाराकडून बनावट बिलिंग, आर्थिक अपहार व निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे अपघात झाल्याबाबत लक्षवेधी सूचना विधानसभेत मांडली. या चर्चेत सदस्य राजू तोडसाम, अभिजित पाटील, प्रशांत बंब यांनी सहभाग घेतला. राज्यमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितले की, वरील प्रकरणात आतापर्यंत झालेल्या चौकशीत संबंधित आर. एन.इलेक्ट्रिकल्स या कंत्राटदाराबाबत कोणतेही निष्कर्ष समोर आलेले नाहीत. संबंधित कंत्राटदाराने ज्या ठिकाणी कामे केली आहेत, तेथे अपघात झाल्याची नोंद नाही. कोल्हापूर परिमंडळात या एजन्सीला काम देण्यात आलेले नसून इतर परिमंडळांतील कामांबाबतही वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत तपास करण्यात आला आहे. तरीदेखील, सदस्यांनी मांडलेल्या विशिष्ट तक्रारी व मुद्द्यांचा पुनर्विचार करून त्यावर सखोल चौकशी केली जाईल. आवश्यक असल्यास पुढील कारवाई करण्यात येईल. तसेच, सर्व कामांची वेळेत पूर्तता व्हावी यासाठी महावितरणकडून सातत्याने पाठपुरावा केला जातो आणि अपघातांच्या घटनांमध्ये संबंधितांना मदत देण्याची कार्यवाही केली जाते, असेही त्यांनी सांगितले. पात्र एजन्सींना नियमानुसार मान्यताप्राप्त यादीत (नोंदणीकृत यादीत) समाविष्ट करून कामे दिली जातात. संबंधित एजन्सीलाही याच प्रक्रियेनुसार काम देण्यात आले आहे. सदस्यांनी उल्लेख केलेल्या अपघातांच्या दोन घटनांबाबत संबंधित एजन्सीने त्या ठिकाणी कामच केलेले नाही, त्यामुळे त्या घटनांसाठी त्यांना जबाबदार धरता येणार नाही. तसेच, पॉवर ट्रान्सफॉर्मर व ब्रेकरसारखे महत्त्वाचे साहित्य महावितरणकडूनच पुरवले जाते, तर स्थानिक पातळीवरील किरकोळ साहित्यच कंत्राटदारांकडून वापरले जाते, असेही राज्यमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर यांनी नमूद केले.

# बाबूजींनी स्वकर्तृत्वातून समाज परिवर्तन घडवले - माधवबाबा महाराज

## माजी आमदार व स्वातंत्र्यसेनानी स्व.बाबुजी आव्हाड यांच्या पुण्यस्मरणानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

पाथर्डी प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्याचे माजी आमदार व थोर स्वातंत्र्यसेनानी शिक्षणमहर्षी स्व.बाबुजी आव्हाड यांनी दूरदृष्टी ठेऊन पाथर्डी तालुक्यात शिक्षणरुपी ज्ञानगंगा आणली बाबूजींचे चरित्र चारित्र्य आणि कर्तुत्व खूप मोठे होते. बाबुजींनी निस्वार्थीपणे आपल्या कार्यकर्तृत्वाने पाथर्डी तालुक्यातील गोरगरीब जनतेची सेवा केली. बाबूजींनी स्वकर्तृत्वातून समाज परिवर्तन घडवले, असे प्रतिपादन माधवबाबा महाराज यांनी केले.



माजी आमदार व स्वातंत्र्यसेनानी स्व.बाबुजी आव्हाड यांच्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. जीवन जगत असताना गरजू उपेक्षित जनतेचा ज्यांनी आशीर्वाद घेतला त्या व्यक्तींची आज जगात महती आहे अशाच व्यक्तींपैकी एक म्हणजे स्व. बाबुजी होत. येथील उसतोडणी मजुरांसाठी व त्यांच्या मुलांच्या हाती कोयता न येता शिक्षणाच्या माध्यमातून मागासलेपणा दूर करण्यासाठी अविरतपणे झटणे बाबुजींनी पसंद केले जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले या उक्तीप्रमाणे त्यांनी समाजसुधारणेचे कार्य केले. या शिक्षण संकुलातून अनेक विद्यार्थी घडले व घडत आहेत आजच्या विद्यार्थ्यांनीही त्यांचे कर्तुत्व अंगीकारावे बाबुजींच्या कर्तुत्वाचे स्मरण करून त्यांचे विचार पुढे नेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन येथील शंकरबाबा मठाचे मठाधिपती परमपूज्य माधवबाबा यांनी केले. ते येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष थोर स्वातंत्र्यसेनानी मा.आमदार स्व.बाबुजी आव्हाड यांच्या २२ व्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी हभप मोहन महाराज सुडके, पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व पाथर्डीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड उपाध्यक्ष ॲड. सुरेशराव आव्हाड, सचिव दिलीपराव गर्जे, प्राचार्य डॉ.बबन चौरे, सेवानिवृत्त प्राचार्य डॉ.जी.पी.ढाकणे, प्रा.शरद मेढे, अनुजा कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# मंठा तालुक्यात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट

## अघोरी उपचारामुळे रुग्णांच्या जिवितास धोका

मंठा । प्रतिनिधी

मंठा शहरासह ग्रामीण भागात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट झाला असून, ते भोळ्या भाबड्या जनतेची आर्थिक लूट करीत असताना आरोग्य खाते झोपेचे सोंग घेताना दिसून येत आहे. काही बोगस डॉक्टरांकडून अघोरी उपचार पध्दती अवलंबिली जात असून, पुढीतील औषधामुळे रुग्णाच्या जिवीतास धोका असल्याने संबधित अधिकाऱ्यांनी तातडीने कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.




मागील काही वर्षात मंठा तालुक्यात बोगस डॉक्टरांवर एकही कारवाई झालेली नाही. ग्रामीण भागात अद्याप आवश्यक त्या आरोग्य सुविधा उपलब्ध नसल्याने कुठलीही पदवी नसलेले बोगस डॉक्टर रुग्णांच्या जीवाशी खेळताना दिसत आहेत. मंठा शहरातही आरोग्याच्या नावाखाली भोंदू डॉक्टर रुग्णांची आर्थिक लूट करीत आहेत. आयुर्वेदिक आणि युनानी औषधांच्या नावाखाली हे बोगस डॉक्टर स्टेरॉइडयुक्त औषधी देतात, नॅचरल उपचार असल्याचे भासवून रुग्णांकडून पैसे उकळतात. काही बोगस डॉक्टर कावीळ, मुळव्याध यावरील उपचारासोबतच कॅन्सरचाही इलाज करण्याच्या नावाखाली रुग्णांना गंडवितात. बोगस डॉक्टरांचा हा गोरखधंदा कित्येक वर्षांपासून बिनबोभाट सुरु असताना तालुक्याचे वैद्यकीय अधिकारी गप्प का, असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे.

बोगस डॉक्टरांची शोध मोहीम राबविण्यासाठीच्या तालुकास्तरीय समित्या कागदोपत्री असून, या गैरप्रकाराकडे जिल्हाधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी विशेष लक्ष घालण्याची मागणी होत आहे.

# बंद पडलेली एकनाथवाडी बस सेवा पूर्ववत सुरु

पाथर्डी प्रतिनिधी

राज्य परिवहन महामंडळाची बस सेवा सुमारे एक वर्षापासून बंद करण्यात आली होती. यावर ग्रामस्थानी वारंवार मागणी करून देखील बस सेवा सुरू करण्यात आली नाही.



राष्ट्रीय महामार्ग ६१ खरवंडी कासार येथे रस्ता रोको करणार असल्याचे निवेदन ग्रामस्थांनी आगार प्रमुख याना दिले असता, २१ मार्च दुपारी राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचऱ्यांनी एकनाथवाडी येथील रस्त्याची पाहणी केली. यावेळी सरपंच नंदा बळीराम डोंगरे व उपसरपंच सचिन नामदेव गायकवाड यांनी प्रत्यक्षात बससेवेसाठी आसणाऱ्या अडचणी समजून घेत रस्त्यावरील खड्डे तातडीने दुरुस्त करून घेतले. यामुळे एकनाथवाडी गावातील तरुण सरळसेवा पोलीसभरती स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी पाथर्डी येथे वास्तव्यास आहेत त्यांच्या जेवणाचा डब्बा गावातून जातो याची आता व्यवस्था झाली आहे. यापुढे बस सेवा सुरळीत सुरू ठेवावी अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने सिद्धार्थ महादेव खेडकर यांनी अधिकाऱ्यांकडे केली.

# परभणीत एकाच कुटुंबातील ४ जणांचा मृत्यू

परभणी । प्रतिनिधी

जिल्ह्याच्या जिंतूर चारठाणा महामार्गावर टेम्पो ट्रॅव्हलर आणि कारची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघाताची घटना घढली. या अपघातात एकाच कुटुंबातील ४ जणांचा जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना समोरा आली आहे.

वसमत येथील सय्यद कुटुंब हे कारने ईदनिमितच्या भेटीसाठी मंठ्याला त्यांच्या नातेवाईकांकडे जात होते, यावेळी याच मार्गावर मंठ्याकडून जिंतूरकडे येणाऱ्या टेम्पो ट्रॅव्हलरची आणि कारची समोरासमोर जोरदार धडक बसली. ही धडक एवढी जोरात होती की, कार अक्षरशः रस्त्याच्या बाजूला गेली. अपघाताची ही घटना सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास घडली. जिंतूर-चारठाणा महामार्गावरील या भीषण दुर्घटनेत कारमधील सय्यद इस्माईल सय्यद मेहबूब, सय्यद सुमय्या अझर अली, अझर मेहमूद आणि ७ वर्षांची सय्यद उपाध सय्यद या ४ जणांचा मृत्यू झाला. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत अपघातग्रस्तांना रुग्णालयात दाखल केले. मात्र, चार जणांच्या निधनाने जिंतूर परिसरात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, पोलिसांनी घटनास्थळी पोहोचत पंचनामा केला आहे.

# पांदण रस्त्याच्या कामाचे देयक खात्यात जमा करण्यासाठी एपीओ व संगणक चालकाकडून पैशाची मागणी

**मंठा । प्रतिनिधी**

मंठा पंचायत समितीच्या रोजगार हमी विभागात भ्रष्टाचाराचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून, एपीओ नितीन राठोड आणि संगणक चालक मोहन वायाळ यांनी पांदण रस्त्याच्या कुशल कामाचे बील मंजूर करुन देयक खात्यात जमा करण्यासाठी ३० हजार रुपयांची मागणी केल्याचा आरोप नारायण तातेराव पुणेकर यांनी केला आहे.

यासंदर्भात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू . पी. एम. यांना दिलेल्या निवेदनात नारायण पुणेकर यांनी म्हटले आहे की, आपण पाडळी दुधा

येथील पांदण रस्त्याचे काम पुर्ण करुनही कुशल बिल मागील दोन ते तीन वर्षापासून थकीत आहे. बिलाचे देयक अद्याप ग्रामपंचायतच्या खात्यावर जमा झालेले नाही. यासंदर्भात आपण मंठा पंचायत समिती कार्यालयातील रोजगार हमी विभागातील एपीओ नितीन राठोड यांना अनेकदा विचारणा केल्यानंतर ३० हजार रुपये मोहन वायाळ यांच्याकडे जमा करा, मगच तुमचे बिल पुढे जाईल, असे त्यांनी सांगितल्याची कॉल रेकॉर्डिंग आपल्याकडे असल्याचे श्री. पुणेकर यांनी या निवेदनात नमूद केले आहे. पुणेकर यांच्या या श्री समितीच्या रोजगार हमी आरोपामुळे मंठा पंचायत असून, मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम.मआणि जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी या भ्रष्टाचार प्रकरणाची तात्काळ चौकशी करून दोषी कर्मचाऱ्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी श्री. पुणेकर यांनी केली आहे. तसेच रखडलेले कुशल कामाचे बिल तातडीने ग्रामपंचायत खात्यावर जमा करून न्याय द्यावा, अशीही मागणीही त्यांनी केली आहे. दरम्यान, या प्रकरणात जिल्हा परिषद प्रशासन काय भूमिका घेते आणि संबंधित कर्मचाऱ्यावर कोणती कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ॲपको इंफ्राटेक प्रायव्हेट लिमिटेड कंपनीकडून अवैध मुरूम उत्खनन

**शासनाच्या महसूल वसूल प्रकरणी कंपनीला ब्लॅक यादीत टाका**

मंठा । प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील हेलसवाडी शिवारात परवानगी दिलेल्या ठिकाणा व्यतिरिक्त इतर ठिकाणाहूनही हजारो ब्रास मुरूम उत्खनन होत असून, ॲपको इंफ्राटेक प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला काळ्या यादीत टाकण्याची मागणी करण्यात आली आहे.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाला जोडणाऱ्या जालना - नांदेड समृद्धी महामार्गाचे काम ॲपको इंफ्राटेक प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला मिळालेले असून या कंपनीकडून जिल्हाधिकाऱ्यांच्या मुरूम उत्खनन व वाहतुकीच्या आदेशाची पायमल्ली केली जात आहे. जिल्हाधिकारी अशीमा मित्तल यांनी मुरूम उत्खननासाठी महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास विनियमन) नियम २०१३ मधील ६६ व ६७ मधील अटी व शर्ती तसेच आदेशासोबतच्या विवरणपत्र अ व ब मधील अटी व शर्तीच्या अधीन राहून मंठा तालुक्यातील हेलसवाडी शिवारातील पाझर तलाव क्रमांक - २ मधील सर्वे नंबर /गट नंबर २६२, २६३, २६४, २६८ मधून २ हेक्टर १८ आर मुरूम ८४८० ब्रास उत्खनन व वाहतुकीची परवानगी २० फेब्रुवारी २०२६ च्या आदेशाप्रमाणे दिली आहे. ही परवानगी देताना उत्खननासाठी २०/ २ / २०२६ ते १८ /३/ २०२६ अथवा ८४८० ब्रास मुरूम गोण खनिज उत्खनन यापैकी जे अगोदर होईल त्या मुदतीपर्यंत व वैध राहील असे आदेशात नमूद केले असताना, संबंधित कंपनीने या कामासाठी नेमलेल्या वैष्णवी कन्स्ट्रक्शन बारामती या सबकंपनीला हे काम दिले, मात्र या कंपनीने मुरूम उत्खनन व वाहतूक करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश पायदळी तुडविले आहेत. मुरूम उत्खनन व वाहतुकीसाठी दिलेल्या परवानगीची मुदत संपलेली असताना कंपनीकडून अद्यापही अवैधरीत्या मुरूम उत्खनन सुरू आहे.

या संदर्भात केशव माणिकराव विसरूप रा. मंठा यांनी केलेल्या तक्रारीनुसार उपविभागीय जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण उपविभाग परतूर यांनी हेलसवाडी शिवारातील अवैधरीच्या होत असलेल्या मुरूम उत्खनन ठिकाणी भेट देऊन पंचनामा केला असता, या कंपनीने मुरूम उत्खननाची परवानगी असलेल्या गट नंबर, सर्वे नंबर व्यतिरिक्त पाझर तलाव क्रमांक १ व काही शेतकऱ्यांच्या खासगी जमिनीमधूनही कंपनीने मुरूम उत्खनन केल्याचे आढळून आले. कंपनीने पाझर तलाव क्रमांक १ व २ मधील अंतर मुरूम उत्खनन करून तीस मीटर एवढे कमी केले आहे. तसेच पाझर तलाव क्रमांक १ च्या मुख्य भिंतीपासून पंधरा मीटर अंतरापासून मुरूम उत्खनन न करता मुख्य भिंती लगतचा मुरूम काढण्यात आला आहे तसेच पाझर तलाव क्रमांक १ च्या सांडव्याची भिंत दहा मीटर एवढी फोडण्यात आल्याचे आढळून आले असून मुरूम उत्खनन करण्याची परवानगी २ मीटरची असताना कंपनीने प्रत्यक्षात तीन, चार काही ठिकाणी पाच, सहा मीटर एवढे खोल उत्खनन केलेले आहे.


जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि- दिनांक-०४/०३/२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती निरज सुभाष चव्हाण रा.लालवाडी ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या स्वतः च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| | निरज सुभाष चव्हाण | स्वत: | १९/०९/२००५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-०४/०३ /२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-२०२ दिनांक-२५/०२/२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती समीर शफीक खाटीक रा.अंबड ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या स्वतः च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| | समीर शफीक खाटीक | स्वत: | ०६/०७/१९९० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-२५/०२ /२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**


# जिल्ह्यातील १२ शिक्षण विस्तार अधिकारी यांची उपशिक्षणाधिकारीपदी निवड

बीड । प्रतिनिधी

जिल्हा तांत्रिक सेवेतील विस्तार अधिकारी( शिक्षण)या संवर्गातून महाराष्ट्र शिक्षण सेवा गट- ब (प्रशासन शाखा) मधील उपशिक्षणाधिकारी व तत्सम संवर्गातील बीडच्या १२ शिक्षण विस्तारअधिकारी यांचं निवड शालेय शिक्षण विभागाच्या वतीने जिल्हा तांत्रिक सेवेतील विस्तार अधिकारी शिक्षण गट (क) श्रेणी-२ या संवर्गातून महाराष्ट्र शिक्षण सेवा गट ब प्रशासन शाखा मधील उपशिक्षणाधिकारी व तत्सम संवर्गातील रिक्त पदावर तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्यासाठी सन( २०२५- २६) या निवड सूचीला सामान्य प्रशासन विभागाने मान्यता दिली आहे.

बीड जिल्ह्यातील विविध ११ पंचायत समिती अंतर्गत गटशिक्षणाधिकारी कार्यालयात हे विस्तार अधिकारी कार्यरत आहेत.

१-बोंदार्डे धनंजय मारुती (विमाप्र) २-भगवान सोपानराव सोनवणे () दिव्यांग ३- रंगनाथ नामदेव राऊत (इमाव ) ४-धनंजय रामराव शिंदे( खुला ) ५-ऋषिकेश जनार्दन शेळके



(खुला) ६- मोहन त्रिंबक काकडे(खुला) ७- नानाभाऊ गणपती हजारे ()

८- हनुमान गहिनीनाथ गव्हाणे (खुला) ९- श्रीमती हिना उमर अन्सारी (इमाव) १०- बाबासाहेब यमाजी उजगरे () ११-श्रीमती प्रणिता पंढरीनाथ कापसे( इमा) व १२- मधुकर शामराव सुवर्णकार (विमाव) १३- खान समंदर आमिर खान( आदिवासी संवर्ग)

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने राज्यातील एकूण ५१ विस्तार अधिकाऱ्यांची लवकरच पदस्थापना देण्यासाठी महसूल विभागनिहाय रिक्त पदांची संख्या लक्षात घेऊन या नियुक्त्या देण्यात येतील ५१ पैकी बारा विस्ताराधिकारी बीड जिल्ह्यातील आहेत. यातील सर्वच विस्तारअधिकारी यांनी प्रभारी उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, व अधीक्षक म्हणून कर्तव्य बजावले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान शिक्षणाधिकारी( प्रा.) डॉ. किरण कुंवर व प्रियराणी पाटील तसेच महाराष्ट्र राज्य कृतिशील अधिकारी कर्मचारी संघाचे राज्याध्यक्ष चंद्रकांत दळवी ,कार्याध्यक्ष मनोहर पोकळे, जिल्हा अध्यक्ष जालिंदर भोरे, जिल्हा कार्याध्यक्ष गौतम चोपडे ,व प्रसार प्रमुख तुकाराम पवार -ठाकूर यांनी केले आहे

## आष्टीत २५ मार्चला विराट हिंदू संमेलन; भव्य शोभायात्रा होणार

आष्टी । प्रतिनिधी

भारतमातेला विश्वगुरू पदावर विराजमान करण्यासाठी आणि हिंदू समाजाला संघटित करण्याच्या उदात्त हेतूने आष्टी येथे विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.विराट हिंदू संमेलन समिती आष्टी मंडळ यांच्या वतीने बुधवार दि. २५ मार्च २०२६ रोजी हे संमेलन पार पडणार असून, शहरात या भव्य कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरू आहे.

या भव्य संमेलनाची सुरुवात एका विशाल शोभायात्रेने होणार आहे. बुधवारी दुपारी ५ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून या शोभायात्रेला सुरुवात होईल आणि ती मुख्य कार्यक्रमस्थळी म्हणजेच बाजारतळ,आष्टी येथे पोहोचेल. या शोभायात्रेचे विशेष आकर्षण म्हणजे, यात जामखेड (जि. अहिल्यानगर) येथील बबलू वस्ताद टेकाळे यांचे मल्लखांब पथकही सहभागी होणार असून त्यांच्या चित्तथरारक कसरती पाहण्याची संधी नागरिकांना मिळणार आहे. आत्मविस्मृती झालेल्या समाजाला स्वतःच्या शक्तीची आठवण करून देणे आणि देशासमोरील समस्यांचे निराकरण करण्यासाठी सर्वांना एकत्र आणणे हा या आयोजनामागील मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले आहे.या महत्त्वपूर्ण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प.रामदास महाराज डोरले हे उपस्थित राहणार आहेत.देवगिरी प्रांत हिंदू जागरण मंचचे अध्यक्ष अंबादास अंभोरे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन करतील. यासोबतच भारत भूषण पुरस्कार विजेते आणि महाराष्ट्रातील पहिले तृतीयपंथी कीर्तनकार गुरुवर्य ह.भ.प.समाधान (माय) महाराज श्रीगोंदाकर यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला लाभणार आहे.

कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. आष्टी आणि परिसरातील सर्व हिंदू बांधवांनी या संमेलनास आणि शोभायात्रेस सहकुटुंब बहुसंख्येने उपस्थित राहावे आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक विराट हिंदू संमेलन समिती, आष्टी मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## नवोदय पूर्व पात्र परीक्षेत दिंद्रुडचा डंका जिल्ह्यातून सर्वाधिक ११ विद्यार्थी पात्र

दिंद्रुड । प्रतिनिधी

नुकताच नवोदय चा इयत्ता सहावी प्रवेशासाठी पुर्व पात्र परीक्षेचा निकाल हाती आला आहे. जिल्ह्यात पात्र झालेल्या ८० विद्यार्थ्यांपैकी माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील सर्वाधिक ११ विद्यार्थ्यांनी या परिक्षेत गुणवत्ता मिळवत पुढील शिक्षणासाठी पात्र ठरले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे व विद्यार्थी घडवणाऱ्या शाळांचे कौतुक होत आहे.

यावर्षी २०२६-२७ शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता ६ वी चे १५४११ विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली होती. या परिक्षेत बीड जिल्ह्यातुन केवळ ८०





गुणवंत विद्यार्थी पात्र होतात. गेल्या काही वर्षांत दिंद्रुड परिसरातील विद्यार्थी या परीक्षेत घवघवीत यश मिळवून नवोदय प्रवेश पात्र होत आहेत. येथील खोलेश्वर विद्यालयाचे अजिंक्य अमोल ठोंबरे, राजवीर बप्पासाहेब डावकर, आदित्य सतीश धुमाळ, गोविंद विष्णू शेळके, वेदांत प्रफुल सलगरे, कु. मनवा ज्ञानेश्वर वाव्हळ, शौर्य रामभाऊ वाघ, स्वप्नील लहुदास कांबळे, आर्यन शंकर मेंडके हे ९ विद्यार्थी तर व्यंकटेश पब्लिक स्कूल ची शरयु बाळु कोल्हापूरे, चंद्रभागा पोदार शाळेचा उज्वल गिते असे एकूण ११ विद्यार्थी यावर्षी गुणवत्ता घेऊन नवोदय विद्यालयात प्रवेशासाठी पात्र ठरले आहेत. शरयु कोल्हापूरे व अजिंक्य ठोंबरे या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे तिसरा व चौथा रॅंक मिळवत दिंद्रुड च्या आदर्श शैक्षणिक शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. सर्व पात्र विद्यार्थ्यांचे दिंद्रुड व पंचक्रोशीत अभिनंदन होत आहे.

## शेतकऱ्यांची अनोखी शक्कल; कडब्याची कुट्टी शेतातच!

आष्टी । प्रतिनिधी

पारंपरिक पद्धतीला फाटा देत येथील एका शेतकऱ्याने ज्वारी काढणीनंतर कडब्याचा प्रभावी वापर करत खर्चात मोठी बचत केली आहे. साधारणपणे ज्वारीची खळी झाल्यानंतर कडव्याच्या पेंड्या बांधणे, त्या गोळा करणे आणि घरी नेण्यासाठी वाहतूक करणे हा खर्चिक व वेळखाऊ टप्पा असतो. मात्र या शेतकऱ्याने वेगळीच शक्कल लढवत कडबा थेट शेतातच कुट्टी करण्याचा निर्णय घेतला.



ट्रॅक्टरच्या सहाय्याने कुट्टी मशीन शेतातच नेऊन कडबा कुट्टी करण्यात आला. त्यामुळे पेंड्या बांधण्याचा त्रास, मजुरीचा खर्च आणि वाहतुकीचा अतिरिक्त बोजा पूर्णपणे टळला. तयार झालेली कुट्टी थेट जनावरांच्या चाऱ्यासाठी उपयोगात येत असल्याने वेळ आणि पैशांची मोठी बचत झाली आहे.

या अभिनव प्रयोगामुळे इतर शेतकऱ्यांसाठीही हा एक आदर्श ठरत असून, कमी खर्चात अधिक उत्पादनक्षमतेकडे वाटचाल करण्याचा मार्ग या माध्यमातून समोर आला आहे.

छाया : शरद रेडेकर, आष्टी

## बीड पोलिस दलाकडून अत्याधुनिक मोबाईल कंट्रोल व्हॅन तैनात

**बीड । प्रतिनिधी**

कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने जिल्हा पोलीस, बीड यांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित मोबाईल कंट्रोल व्हॅन तयार करून कार्यान्वित केल्या असून अशा एकूण ०२ व्हॅन उपलब्ध आहेत. सदर व्हॅनमध्ये प्रत्येकी एकूण २५ आधारित कॅमेरे बसविण्यात आले असून त्यामध्ये ०१ कॅमेरा, ०६ फेस रिकग्निशन कॅमेरे जे प्रत्येक व्यक्तीचा चेहरा ओळखून फोटो जतन करतात, तसेच ०४ कॅमेरे जे वाहनांचे नंबर प्लेट ओळखून नोंद ठेवतात, यांचा समावेश आहे.

या सर्व कॅमेऱ्यांद्वारे व्यक्ती व वाहनांचे स्पष्ट दृश्य टिपणे शक्य होते. विशेष म्हणजे हे सर्व कॅमेरे कोणत्याही केबलशिवाय सुमारे १० किलोमीटरपर्यंत लाईव्ह मॉनिटरिंगसाठी जोडलेले असून व्हॅनमध्येच स्क्रीनवर थेट दृश्य पाहता येते, ज्यामुळे घटनास्थळीच देखरेख व तात्काळ निर्णय घेणे शक्य होते. याशिवाय व्हॅनमध्ये स्वतंत्र लाईटिंग सिस्टम व सुमारे ६ तासांचा पॉवर बॅकअप उपलब्ध आहे.

सदर अत्याधुनिक मोबाईल कंट्रोल व्हॅनचा वापर पाचेगाव (ता. गेवराई) येथे झालेल्या कानिफनाथ महाराज यात्रेदरम्यान प्रभावीपणे करण्यात आला. मागील वर्षी या यात्रेदरम्यान दोन समुदायांमध्ये तणाव निर्माण झाला होता; मात्र यावर्षी पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके आणि पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या नेतृत्वाखाली रणनीतीपूर्वक नियोजन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व कडक बंदोबस्त करण्यात आल्यामुळे संपूर्ण कार्यक्रम शांततेत व सुरळीत पार पडला. गेवराई विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी सलग तीन दिवस सतत ड्युटी करून प्रभावी कामगिरी बजावली तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी या प्रणालीच्या आधारे एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा देखील दाखल करण्यात आला.

या उपक्रमामुळे गर्दी नियंत्रण अधिक प्रभावी ◀◀ पान ३ वर




## माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांना 'चंपावतीरत्न' पुरस्कार प्रदान

बीड । प्रतिनिधी

माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांना नुकताच प्रतिष्ठित 'चंपावतीरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या सोहळ्यात बोलताना त्यांनी आपल्या कार्याचे श्रेय जनतेला देत, जिल्ह्याच्या प्रलंबित प्रश्नांवर आणि विकासावर भाष्य केले.

रविवार दि.२२ रोजी हॉटेल नीलकमल येथे रोटरी क्लब ऑफ बीडच्या वतीनेमाजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांना 'चंपावतीरत्न' पुरस्कार रो.सुधीर लातुरे, मयंक गांधी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी रा.ओम मोतिपवळे, रो.हरीष



**बीडच्या जनतेला केला सन्मान समर्पित**

मोटवाणी, ह.भ.प.विनय पाटांगणकर, सुभाषचंद्र सारडा, नितीनचंद्र कोटेचा, समीर काझी, अजित वरपे, दिलीप खिस्ती, सुनिल क्षीरसागर, महेश वाघमारे, ॲड.कालिदास थिगळे, सत्यनारायण लाहोटी, विलास बडगे, दिनकर कदम, गंगाधर घुमरे, प्रा.जगदिश काळे, अरूण डाके,नानासाहेब काकडे,अरुण बोगाने रो.विकास उमापुरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. पुरस्काराला उत्तर देताना माजी मंत्री क्षीरसागर म्हणाले की, वादापेक्षा विकासावर विश्वास ठेवणाऱ्या जनतेने मला जी साथ दिली, त्यामुळेच हे शक्य झाले. हा पुरस्कार मी बीड जिल्ह्यातील तमाम जनतेला समर्पित करतो. ५० वर्षांपूर्वीचा जिल्हा आणि आजचा जिल्हा यातला फरक सर्वांच्या समोर आहे. आम्ही सर्वच काही केले असा आमचा दावा नाही, मात्र जे-जे शक्य होते ते करून दाखवले. असे सांगून त्यांनी पाणी प्रश्नावर विशेष भर दिला. ते म्हणाले, मराठवाड्याच्या हक्काचे २८ टीएमसी पाणी लवकरात लवकर मिळावे, हीच आमची मुख्य इच्छा आहे. बीड जिल्ह्यातील मजुरांच्या ◀◀ पान ३ वर

### माजी खा.स्व.काकूंना मिळाला होता चंपावतीरत्न पुरस्कार

जिल्ह्याच्या माजी खासदार स्व.केशरबाई क्षीरसागर उर्फ काकू यांना सन २००२-०३ मध्ये रोटरी क्लब ऑफ बीडच्या वतीने चंपावतीरत्न पुरस्कार मिळाला होता आणि माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांना पण सन २०२५-२६ मध्ये चंपावतीरत्न पुरस्कार मिळालेला आहे.

## हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे बस व बसस्थानक स्वच्छता अभियानाला मूल्यांकन समितीची भेट



चौसाळा । प्रतिनिधी

येथील बस स्थानकात २३ ०३ २०२६ रोजी मूल्यांकन समितीची भेट दिली.

हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे बस स्वच्छ अभियान कार्यक्रमात एसटी महामंडळाच्या मूल्यांकन समितीने चौसाळा मांजरसुंबा आधी बस स्थानकांना भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली चौसाळा येथे सदर समिती आली असता त्यांनी स्थानिक पत्रकार यांना व प्रवासी मित्र यांना बोलवून त्यांनी त्यांचा अहवाल मागितला त्यानुसार सदर पत्रकारांनी बस स्थानक बाबत सुरू असलेल्या बांधकामाबाबत चर्चा करून सदर बंद पडलेले काम नागरिकांचा अंत न पाहता संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने सुरू करून नागरिकांचे होत असलेले अतोनात हाल थांबवावे अन्यथा चौसाळा येथील नागरिकांना इतर मार्गांचा अवलंब कडून आपल्या मागणीसाठी रस्त्यावर उतरावे लागेल असाही सूर यावेळी व्यक्त करण्यात आला या मूल्यांकन अभियानात रायगड येथील सदस्य बीड आगारातील वाहतूक अधिकारी नागरगोजे मॅडम चौसाळा वाहतूक नियंत्रक बबन येडेवाशीमित्र कचरू बोबडेआधी नागरिक उपस्थित होते.

# हजारो भाविकांच्या साक्षीने मिडसांगवीत पुष्पवृष्टी

## संत -महंत, धार्मिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

शिरूर । प्रतिनिधी

श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथगडाचा ४८ वा फिरता नारळी सप्ताह यावर्षी पाथर्डी तालुक्यातील मिडसांगवी या गावांमध्ये आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताहाची आरंभ पुष्पवृष्टी आज हजारो भाविकांच्या साक्षीने व संत-महंत, धार्मिक सामाजिक राजकीय त्याचबरोबर विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडली आहे.

श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचे मठाधिपती वै. महंत निगमानंद महाराज यांच्या प्रेरणेतून आरंभीत करण्यात आलेला गडाचा फिरता नारळी सप्ताह यावर्षी बीड -अहिल्यानगर जिल्ह्याच्या सीमेवरती असलेल्या पाथर्डी तालुक्यातील मौजे मिडसांगवी येथे आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताहाचा नारळ सुमारे दहा-बारा वर्षांपूर्वी वै. महंत स्वामी निगमानंद महाराज यांच्या हस्ते गावकऱ्यांनी उचलला होता. गेल्या अनेक वर्षापासून गावकरी या सप्ताहाच्या पूर्वतयारीला लागले होते. हा सप्ताह आज स्वामी निगमानंद महाराजांच्या पश्चात



जरी पार पडत असला तरी या कार्यक्रमावरती निगमानंद महाराजांची कृपा छाया असल्याचे भाविक भक्त या ठिकाणी सांगत आहेत.



वै.महंत स्वामी निगमानंद महाराज यांनी घालून दिलेल्या गडाच्या परंपरेला उत्तराधिकारी महंत जनार्दन महाराज ◀◀ पान ३ वर

### भाविकांनी एकत्रित येऊन आनंद लुटावा

गुरुदेव वै. महंत स्वामी निगमानंद महाराज यांनी भाविक-भक्तांना एकत्रित आणून त्यांच्यामध्ये आप आपसात प्रेम निर्माण व्हावे. आपुलकीने जीवन जगावे यासाठी ही फिरत्या नारळी सप्ताहाची गुरुदेवांनी परंपरा घालून दिलेली आहे. त्या परंपरेला अनुसरून गडाचा सप्ताह मिडसांगवी मध्ये मोठ्या भव्य स्वरूपात आरंभित करण्यात आला आहे. सप्ताहाचा गावकऱ्यासह पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी एकत्रित येऊन आनंद लुटावा असे अवाहन श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचे मठाधिपती महंत स्वामी जनार्दन महाराज यांनी केले आहे.

### गावकऱ्याकडून उत्कृष्ट नियोजन

मिडसांगवी गावकऱ्यांकडून सप्ताह निमित्त येणाऱ्या संत-महंत भाविक भक्तांच्या सुख सोयीसाठी उत्कृष्ट नियोजन करण्यात आले असून यानिमित्त येणाऱ्या भाविक भक्तांना भोजनासाठी आठही दिवस पंगतीच्या माध्यमातून अन्नछत्र खुले करण्यात आले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...



# वसंत मोरेंना मोठा झटका !
## कोणत्याही क्षणी अटक होण्याची शक्यता

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहराच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे (उबाठा) गटाचे आक्रमक नेते व माजी नगरसेवक वसंत मोरे यांच्या अडचणीत कमालीची वाढ झाली आहे.

अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायद्यांतर्गत (ॲट्रॉसिटी क्ट) दाखल गुन्ह्यात पुणे जिल्हा न्यायालयाने त्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला आहे. यामुळे शिवाजीनगर पोलीस ठाण्याकडून मोरे (तरीरपीं चींश) यांच्या अटकेची कारवाई कोणत्याही क्षणी होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. शिवसेना (उबाठा) पक्षाचे पुण्यातील प्रमुख नेते आणि आक्रमक वक्तृत्वासाठी प्रसिद्ध असलेले वसंत मोरे यांच्यावर दलित समाजाच्या भावना दुखावणाऱ्या वक्तव्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. या प्रकरणामुळे पक्षातील त्यांची प्रतिमा धोक्यात आली असून, राजकीय विरोधकांकडून टीकेची झोड उठवली जात आहे. मोरे यांनी अटकेपासून वाचण्यासाठी अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता, मात्र न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून आणि प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन हा अर्ज फेटाळला. न्यायालयाच्या या निर्णयामुळे पोलिसांना मोरे यांना ताब्यात घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.मोरे यांनी



अटकेपासून वाचण्यासाठी अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता, मात्र न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून आणि प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन हा अर्ज फेटाळला. न्यायालयाच्या या निर्णयामुळे पोलिसांना मोरे यांना ताब्यात घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. प्रकरणाची सुरुवात २५ फेब्रुवारी २०२६ रोजी पुणे महानगरपालिकेत वसंत मोरे यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेपासून झाली. या परिषदेत त्यांनी वंचित बहुजन आघाडीचे उपाध्यक्ष अविनाश विश्वनाथ लहाडे यांचे वडील विश्वनाथ तुकाराम लहाडे (वय ७२, ठेकेदार) यांच्याबद्दल वादग्रस्त आणि अपमानास्पद वक्तव्य केल्याचा आरोप आहे.

फिर्यादी विश्वनाथ लहाडे यांच्या म्हणण्यानुसार, वसंत मोरे यांना आपण अनुसूचित जातीचे असल्याची माहिती असतानाही त्यांनी जाणीवपूर्वक व हेतूपूर्वक आपल्याबद्दल अपमानास्पद वक्तव्य केलं. हे वक्तव्य सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने कुटुंबीयांची सामाजिक बदनामी झाली असून, मानसिक ताण आणि भीतीच्या वातावरणात जीवन व्यतीत करावे लागत असल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या तक्रारीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी प्रकरणाची प्राथमिक चौकशी केली असून, व्हायरल व्हिडिओ आणि इतर पुराव्यांचा अभ्यास सुरू आहे.

# पुणे-नागपूर वंदे भारतला सुपरहिट प्रतिसाद; ३५ कोटींचे उत्पन्न

**पुणे । प्रतिनिधी**



पुण्यातून धावणाऱ्या पुणे-कोल्हापूर-पुणे, पुणे-हुबळी या दोन 'वंदे भारत' गाड्यांच्या तुलनेत पुणे-नागपूर (अजनी)-पुणे 'वंदे भारत' या गाडीने सर्वाधिक प्रवाशांची वाहतूक करत सर्वाधिक उत्पन्न मिळवून देत विदर्भ-पश्चिम महाराष्ट्र जोडणारी सुपर हिट 'वंदे भारत' रेल्वे ठरली आहे. याच पुणे-नागपूर (अजनी)-पुणे 'वंदे भारत' गाडीने अवघ्या ११ महिन्यांत पुणे विभागाच्या तिजोरीत ३५ कोटी रुपयांची भर घातल्याचेही समोर आले आहे.

भारतीय रेल्वेची महत्त्वाकांक्षी आणि वेगवान ओळख असलेल्या 'वंदे भारत' एक्स्प्रेसने पुणे विभागात आपला दबदबा निर्माण केला आहे. एप्रिल २०२५ ते फेबुवारी २०२६ या ११ महिन्यांत पुण्यातून सुटणाऱ्या आणि येणाऱ्या 'वंदे भारत' गाड्यांच्या आकडेवारीवरून हे स्पष्ट झाले की, प्रवासी या सेवेला पसंती देत असून, रेल्वेच्या तिजोरीत यामुळे कोट्यवधींची भर पडली आहे. पुणे-अजनी (२६१०१) आणि अजनी-पुणे (२६१०२) या दोन गाड्यांच्या एकूण १७३ फेऱ्यांमध्ये प्रवासीसंख्या प्रत्येकी १ लाख २८ हजारांच्या वर गेली आहे. विशेष म्हणजे, या मार्गावर बुकिंगचे प्रमाण अनुक्रमे १४०.३९ टक्के आणि १३९.९५ टक्के इतके नोंदविले आहे. क्षमतेपेक्षा जास्त बुकिंग होणे, हे या मार्गावरील प्रवाशांची प्रचंड मागणी दर्शवत आहे. या गाड्यांमधून रेल्वेला सुमारे ३५ कोटी रुपयांहून अधिक उत्पन्न मिळाले आहे. यावरून विदर्भ-पश्चिम महाराष्ट्राला जोडणारी ही लोकप्रिय गाडी ठरल्याचे दिसत आहे. पुणे-हुबळी (२०६७०) 'वंदे भारत' एक्स्प्रेसनेही चांगली कामगिरी केली असून, ८७.९ टक्के बुकिंगसह रेल्वेला ७ कोटींहून अधिक महसूल मिळवून दिला आहे. कोल्हापूर मार्गावर (२०६७३/२०६७४) प्रवाशांचा प्रतिसाद संमिश्र असला, तरी सरासरी ६० ते ६५ टक्क्यांपर्यंत बुकिंग राहिले आहे. या मार्गावरून धावणाऱ्या १४३ फेऱ्यांमधून ७ ते ८ कोटींची कमाई झाली आहे.

# पुण्यात गॅसपुरवठा पूर्वपदावर; ८३ हजार सिलिंडरचे वितरण

**पुणे । प्रतिनिधी**

युद्धजन्य परिस्थितीत निर्माण झालेल्या गॅस टंचाईनंतर आता घरगुती गॅसपुरवठा पूर्वपदावर येत आहे. शनिवारी दिवसभरात ७२ हजार बुकिंग, तर ८३ हजार सिलिंडरचे वितरण केल्याची माहिती जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.

सामान्यांना सिलिंडरचे वितरण सुरळीत व्हावे, यासाठी यापूर्वी बुकिंग केलेल्या ग्राहकांनाच प्राधान्य द्यावे, अशा सक्त सूचना जिल्हा प्रशासनाने गॅस एजन्सींना दिल्या आहेत. त्यामुळे ज्या एजन्सीधारकांकडे अधिक बुकिंग आहे, त्यांना प्राधान्याने सिलिंडरचे वितरण करण्यात येत आहे. वेटिंगवरील ग्राहकांना प्राधान्याने सिलिंडर देण्यासाठी संबंधित एजन्सींना अधिकचा पुरवठा करण्यात येत आहे.



त्यामुळे मागणी व पुरवठा यातील तफावत पुढील तीन ते चार दिवसांत सामान्य होईल, असा विश्वास जिल्हा प्रशासनाने व्यक्त केला आहे.

जिल्ह्यात शनिवारी ७० हजार ८५९ गॅस सिलिंडरचे बुकिंग करण्यात आले होते. तर कंपन्यांकडून ९० हजार ००१ सिलिंडरचे एजन्सींना वितरण करण्यात आले. तसेच एजन्सींकडून प्रत्यक्ष ग्राहकांना ८३ हजार ४४० सिलिंडरचे वितरण झाले. त्यामुळे मागणीपेक्षा सुमारे १३ हजार अधिक सिलिंडर देण्यात आले आहेत. यात जुन्या बुकिंगचाही समावेश आहे. पुढील तीन ते चार दिवसांत वेटिंगवरील सर्व ग्राहकांना सिलिंडरचे वितरण करण्यात येईल व त्यानंतर मागणीनुसार संपूर्ण पुरवठा त्या त्या दिवशी सुरळीत होईल, अशी माहिती जिल्हापुरवठा अधिकारी महेश सुधळकर यांनी दिली. दरम्यान, काही एजन्सीधारकांनी जिल्हा प्रशासनाने दिलेल्या ९६ तासांच्या आत वितरणाच्या अटीबाबत नाराजी व्यक्त केली. या कालावधीत सिलिंडर पुरवणे अवघड असल्याचे या एजन्सीधारकांचे म्हणणे आहे. मात्र, घरपोच वितरणाची व्यवस्था असलेल्या एजन्सीधारकांना या स्वरुपाची अडचण आलेली नाही. त्यामुळे वितरणाची व्यवस्था नसलेल्या एजन्सींनी ती तातडीने करावी, असे स्पष्ट निर्देश देण्यात आल्याचे सुधळकर यांनी सांगितले.

# शिरूर नगरपरिषदेकडून थकबाकीदारांवर धडक कारवाई; मालमत्ता सील मोहीम तीव्र

**शिरूर । प्रतिनिधी**

आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी सर्व कर भरणे गरजेचे असताना शिरूर शहरातील मालमत्ता कर व पाणीपट्टी न भरणाऱ्या नागरिक व व्यापारी संकुल धारकांविरुद्ध शिरूर नगर परिषदेने मोहीम तीव केली आहे. मुख्याधिकारी प्रीतम पाटील यांनी रविवारी (दि. २१) सुट्टी असून, देखील स्वतः रस्त्यावर उतरून मालमत्ता सील करीत कर भरण्याचे मालमत्ताधारकांना आवाहन केले.

आर्थिक वर्ष संपण्यास अवघे काही दिवस शिल्लक असल्याने मार्चअखेरीस नगर परिषदेची अपेक्षित वसुली पूर्ण होणे अत्यावश्यक आहे. त्या अनुषंगाने करसंकलन विभागाने थकीत देयकदारांविरुद्ध जप्ती, अटकावणी व सील कारवाई अधिक तीव केली आहे. रविवारी शिरूर नगर परिषद हद्दीतील विविध ठिकाणी मालमत्ता थकबाकी करापोटी सील करण्यात आली. या धडक कारवाईवेळी नगर



परिषदेचे मुख्याधिकारी प्रीतम पाटील, प्रशासकीय अधिकारी राहुल पिसाळ, कर निरीक्षक माधव गाजरे, नगररचना सहायक पंकज काकड, पाणीपुरवठा अभियंता आदित्य बनकर, सहायक करनिरीक्षक दीपक कोल्हे, संगणक अभियंता रत्नदीप पालके, अग्निशमन अधिकारी सचिन वाळुंज, ज्ञानेश्वर चाकणे, चंद्रकांत पठारे, अमृत भवर, संतोष गायकवाड आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मुख्याधिकारी प्रीतम पाटील यांनी या वेळी नागरिकांना आवाहन केले की, नगर परिषदेची मार्च महिन्यातील वसुली पूर्ण होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे शिरूर शहरातील सर्व नागरिकांनी मालमत्ता कर तसेच पाणीपट्टीची थकबाकी तत्काळ भरावी; अन्यथा थकबाकीदारांविरुद्ध सील, जप्ती व अटकावणीची कारवाई यापुढेही अधिक कठोरपणे सुरू राहणार आहे. नागरिकांच्या सोयीसाठी मालमत्ता कर व पाणीपट्टी भरण्याची सुविधा ऑनलाइन पद्धतीने, तसेच नवीन प्रशासकीय इमारतीतील नागरी सुविधा केंद्रात आणि जुन्या नगर परिषद इमारतीतील कर भरणा केंद्रात उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेत तत्काळ करभरणा करून नगर परिषदेस सहकार्य करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# नगरसेविका भक्ती गायकवाड यांच्या पाठपुराव्याला यश; औंध-डेक्कन बससेवा पुन्हा सुरु

**पुणे । प्रतिनिधी**

औंध ते डेक्कन जिमखाना दरम्यान धावणारी १०५ क्रमांकाची बससेवा (झींपिश छशुी) अखेर पुन्हा सुरू करण्यात आली आहे. झचझचङची ही सेवा अनेक दिवसांपासून बंद होती. त्यामुळे औंध-बाणेर परिसरातील नागरिकांकडून ती पुन्हा सुरू करण्याची सातत्याने मागणी होत होती.

निवडणुकीनंतर हा प्रश्न सोडवण्याचे आश्वासन नगरसेविका भक्ती अजित गायकवाड व इतर स्थानिक प्रतिनिधींनी दिले होते.

शिवाजीनगर मतदार संघाचे आमदार सिद्धार्थ शिरोळे यांच्या मार्गदर्शनाखाली त्या आश्वासनाची पूर्तता (झींपिश छशुी) करत आज सकाळी ८:१५ वाजता पहिल्या बसचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.या वेळी पीएमपीएमएलचे संचालक अजय खेडेकर, उपमहापौर परशुराम



वाडेकर, नगरसेविका भक्ती गायकवाड, सपना छाजेड, सनी निम्हण, अभिजित गायकवाड यांच्यासह आनंद छाजेड, शिरीष नाईकरे, रिपाई चे शिवाजीनगर युवक अध्यक्ष महादेव साळवे , मनोज दळवी, वसंत जुनावणे ,निलेश गायकवाड , सुजाता पाटील, सूर्यकांत कळापुरे ,सतीश तारू ,मारुती पाटील, जॉन प्रकाश, मंगल जाधव, सुरेखा कुलकर्णी तसेच अनेक मान्यवर, स्थानिक नागरिक, महिला-भगिनी आणि पीएमपीएमएल अधिकारी उपस्थित होते. नगरसेविका भक्ती गायकवाड, व औंध सोशल फाउंडेशन चे अध्यक्ष अभिजीत गायकवाड यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे डीपी रोड परिसरात अनेक वर्षांपासून बंद असलेली ही बससेवा (झींपिश छशुी) पुन्हा सुरू झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. ही सेवा सुरू झाल्यामुळे औंध-बाणेर ते डेक्कन परिसरातील प्रवास अधिक सोयीस्कर होणार आहे.

# खेडमध्ये भटक्या कुत्र्यांचा हैदोस; कुत्र्यांच्या टोळीनं एका कुत्र्याचा घेतला जीव



**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात भटक्या कुत्र्यांचा पुन्हा एकदा थरकाप उडवणारा प्रकार समोर आला आहे. राजगुरुनगर शहरात भटक्या कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्यात एका कुत्र्याचा मृत्यू झाला आहे. ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही मध्ये कैद झालीय. काही दिवसांपूर्वीच चाकण परिसरात भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात ३२ वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली होती. त्या घटनेनंतरही परिस्थितीत कोणताही बदल न झाल्याचे चित्र आता पुन्हा स्पष्ट झाले आहे. दरम्यान, या घटनेमुळे राजगुरुनगर शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून लहान मुले आणि नागरिकांना घराबाहेर पडणेही कठीण झाले आहे. परिणामी, नागरिकांमध्ये संतापाची भावना वाढताना दिसत आहे. नगरपरिषदेकडून ठोस उपाययोजना न केल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. भटक्या कुत्र्यांची वाढती संख्या आणि वारंवार होणारे हल्ले, यामुळे प्रशासनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत.

# लोणी काळभोरमध्ये पानटपरीतून अमली पदार्थ विक्रीचा पर्दाफाश; दुकानदार अटकेत

**लोणी काळभोर । प्रतिनिधी**

हवेली तालुक्यातील आष्टापूर फाटा परिसरात पानटपरीच्या आडून सुरू असलेला अमली पदार्थ विक्रीचा प्रकार लोणीकंद पोलिसांनी उघडकीस आणला. येथील 'मल्हार पान हाऊस' या दुकानात 'नशेली पान'च्या नावाखाली अमली पदार्थ विक्री होत होती. या दुकानावर पोलिसांनी छापा टाकून दुकानचालकाला अटक केली. या कारवाईत ७९६ ग्रॅम 'मेफेड्रॉन' (एमडी) मिश्रित अमली पदार्थ तसेच मोबाईल, असा एकूण १ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी रोहित त्रिंबक आंबेकर (वय २६, रा. नायगाव, ता. हवेली) या दुकानचालकाला अटक करण्यात आली असून, त्याच्यावर एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हवालदार स्वप्निल जाधव यांना बातमीदारामार्फत या दुकानात ड्रग विक्री सुरू असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठांच्या आदेशाने फॉरेन्सिक टीमसह छापा टाकण्यात आला. दुकानाची पंचांसमक्ष झडती घेतली असता काउंटरमधील ड्रॉवरमध्ये सिल्व्हर पिशवीत ठेवलेली पिवळ्या रंगाची संशयास्पद भुकटी आढळून आली.

चौकशीत आरोपीने 'म्फेटामाइन' आणि 'मेथॅम्फेटामाइन' ही घातक पावडर पानात मिसळून ग्राहकांना विक्री करत असल्याची कबुली दिली. फॉरेन्सिक तपासणीमध्येही ही बाब स्पष्ट झाली असून, 'पाना'च्या नावाखाली थेट अमली पदार्थांचा पुरवठा होत असल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. या कारवाईत ८० हजार रुपये किमतीची अमली भुकटी आणि ५० हजार रुपयांचा मोबाईल जप्त करण्यात आला आहे. दरम्यान, आरोपीकडे हे अमली पदार्थ कुठून आले आणि या रॅकेटमध्ये आणखी कोण सामील आहेत, याचा सखोल तपास पोलिस उपनिरीक्षक बेंदगुडे करीत आहेत. या घटनेमुळे पानटपऱ्यांच्या आडून सुरू असलेल्या अमली पदार्थ विक्रीच्या जाळ्याबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, अशा ठिकाणी आणखी कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे

# मगरपट्टा सिटीत कालवा फुटल्याने पूरसदृश स्थिती; ऐन उन्हाळ्यात लाखो लीटर पाणी वाया

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील मगरपट्टा सिटीच्या मागील बाजूस खडकवासला धरणातून दौंडकडे जाणारा नवीन मुठा कालवा फुटल्याची घटना घडली आहे. यामुळे लाखो लिटर पाणी वेगाने नागरी वस्तीत शिरले असून, मगरपट्टा आणि हडपसर परिसरात अचानक पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. सध्या येथील रस्ते पूर्णपणे पाण्याखाली गेले आहेत.

पाण्याचा प्रवाह इतका प्रचंड होता की, रस्त्यावरील अनेक वाहने वाहून गेली आहे. या घटनेमुळे परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी झाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. एका बाजूचा रस्ता पूर्णपणे बंद करण्यात आला असून




एकाच मार्गावर वाहतूक सुरू असल्याने सुमारे दोन किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. दरम्यान, परिस्थितीचे गांभीर्य ओळखून खडकवासला पाटबंधारे विभागाने तातडीने कालव्याचा प्रवाह बंद केला आहे.

# वायसीएम रुग्णालयात जन्मनोंदणीतील हलगर्जीपणा; पालकांची धावपळ

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण (वायसीएम) रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी चक्क जन्मनोंदणी वहीमध्ये बाळाच्या जन्माची नोंद केली नाही. ही बाब संबंधित पालकाने वायसीएम रुग्णालयाच्या प्रशासनाच्या लक्षात आणून दिल्याने रुग्णालय परिसरात खळबळ उडाली आहे. बाळाचा जन्म २०२२ मध्ये होऊन देखील कर्मचाऱ्यांच्या हालगर्जीपणामुळे जन्म दाखल्याची रजिस्टरला नोंद झाली नसून, संबंधित प्रशासनाने अशा वर्करची जिम्मेदारी दाखवून आपली जबाबदारी झटकून टाकली. त्यामुळे पालकांना जन्म दाखला मिळणे कठीण झाले आहे.

सध्या शाळेमध्ये युकेजी, एलकेजी प्रवेशासाठी विद्यार्थ्यांच्या जन्मदाखल्याची मागणी वाढली आहे. यासाठी महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण (वायसीएम) रुग्णालयात जन्म-मृत्यू कार्यालयात




दाखले काढण्यासाठी पालकांची रांग पाहवयास मिळत आहे. आरटीईमधून आपल्या मुलाला शहरातील नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश मिळाला तर इयत्ता दहावीपर्यंतच्या शिक्षणाची चिंता मिटेल, या अपेक्षेने पालक वायसीएम रुग्णालयात जन्म दाखला काढण्यासाठी पळापळ करताना दिसत आहेत. आतापर्यंत किती बालकांच्या जन्मनोंदणी बाकी आहेत असा प्रश्न नागरिक करत आहेत.

वायसीएम रुग्णालयात बाळाचा जन्म होऊन चार वर्षे झाले तरी वायसीएम रुग्णालयात जन्म दाखला रजिस्टरला कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे नोंदणी केली नाही. कर्मचाऱ्यांनी बाळाच्या जन्म दाखल्याची नोंद रजिस्टरला केली नसल्याने बाळाच्या जन्म दाखला मिळणे कठीण झाले आहे. अशा बेजबाबदार कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी संतप्त पालकांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे. जन्म दाखल्याची वेळ सकाळी ९ ते १२ आहे, असे संबंधित पालकांना सांगून हे कर्मचारी निवांत बसून असतात. जन्मदाखला कार्यालयात नागरिक नसले तरी नागरिकांना ताटकळत बसावे लागते. दाखल्यासाठी आलेल्यांमध्ये महिला व ज्येष्ठ नागरिकांचा मोठ्या संख्येने समावेश असतो. महापालिकेने जन्म-मृत्यू नोंदणी विभागाबरोबरच सर्व प्रभागातील कार्यालयात जन्म-मृत्यू दाखले देण्याची व्यवस्था केली आहे. सर्व ठिकाणी स्वतंत्र कर्मचारी देखील आहेत. त्यासाठी संगणक प्रणालीच्या माध्यमातून हे दाखले ऑनलाईन वितरित केले जातात. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी देखील जन्म दाखले काढण्यासाठी महिलांची गर्दी होत आहे. जन्ममृत्यू विभागाच्या ढिसाळ नियोजनाचा फटका नागरिकांना बसत आहे.

# शेतकरी पुत्राची कृषी अधिकारीपदी झेप; आळे येथील आदित्य तितरचे यश

**पुणे । प्रतिनिधी**

आळेफाटा आळे (ता. जुन्नर) येथील आदित्य सोमनाथ तितर याने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत महाराष्ट्र लोकसेवा



आयोगातर्फे (एमपीएससी) मंडळ कृषी अधिकारी वर्ग २ पदी निवड झाली. शेतकरी असलेले वडील शेतकरी सोमनाथ तितर यांचे स्वप्न आदित्यने पूर्ण केले आहे. या निवडीमुळे आळे पंचक्रोशीतून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

आदित्यचे शालेय शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पारनेर येथे झाले. तर माध्यमिक शिक्षण आळे येथील ज्ञानमंदिर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय व टाकळी या ठिकाणी झाले. बारामती येथील कृषी महाविद्यालयात बीएससी. ग्री तसेच राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ या ठिकाणी एमएससी ग्रीपर्यंत शिक्षण झाले. यापूर्वी सन २०२१-२२ एमपीएससी परीक्षा दिली होती. परंतु थोड्या गुणांनी अपयश आले होते. परंतु खचून न जाता पुन्हा जोरदार तयारी करून आदित्यने यश संपादन केले आहे.

cmyk